
श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक

UM




नागपूरला ताजुद्दीन बाबांच्या दर्ग्याला लागलेली आग शिरडीला श्रीबाबांना अंतर्ज्ञानाने लगोलग समजली. त्यानी द्वारकामाईतील धुनीत भरपूर पाणी शिंपडले व तिकडे अग्नी देवतेला शांत होण्याची विनवणी केली. बाबा धुनीत पाण्याचा शिडकावा कां करताहेत हे कुणालाच त्यावेळी समजले नाही पण चार दिवसांनी तेथल्या सर्व टीकटाकचे पत्र आले तेव्हा बाबांनी केलेल्या कारवाईचा अर्थ भक्तांना कळला. धन्य धन्य साईबाबा! आपल्या भक्तांच्या संकटाला ते असे सत्वर धावून गेले.

जून १९८५ )

( किंमत १ रुपया

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्रीसाईलीला

जून १९८५

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

**श्री. रा. द. वने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे** एम. ए. पी. एच. डी. (इंग्रजी आवृत्ती)

**श्री.सदानंद चेंदवणकर** (मराठी आवृत्ती)


## श्रीसाई वाक्सुधा


**वर्ष ६४ वे)    किंमत १ रुपया    (अंक ३ रा**

दूरध्वनी ८८२२५६१

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर रस्ता, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

सद्गुरु – शब्दें वृत्ति उठतां ।
साईच प्रथम आठवती चित्ता ।
भेच ठाकती सन्मुखता ।
ठेविता माथां निजहस्त ॥२॥

धुनी माजील उदी समन्वित ।
पडे जंव मस्तकी वरद हस्त ।
हृदय स्वानंदे उलून येत ।
प्रेम ओसंडत नेत्रांतूनी ॥३॥

नवल गुरु हस्त स्पर्श विंदान ।
प्रलयाग्नींतही न होई जो दहन ।
त्या सूक्ष्म देहाचें करी ज्वलन ।
भस्मीभवन कर स्पर्शे ॥४॥

चुकूनि देवाची कथा वार्ता ।
निघाल्या उठे तिडीक माथां ।
[illegible] प्रवाहे बाष्कळता ।
[illegible] स्थिरता लाभावी ॥५॥

शिर[illegible]तां करकमल ।
अनेका जन्मीचे परिपक्व मल ।
जाती धुवूनि होती निर्मल ।
भक्त प्रमळ साईचे ॥६॥

—श्री साई सच्चरित्र अध्याय ६ वा.

# सुविचार

उद्यमेव हि सिध्यन्ति
कार्याणि न मनोरथैः ।
नहि सुप्तस्य सिंहस्य
प्रविशन्ति मुखे मृगाः ॥


कोणतेही कार्य उद्योगानेच सिद्धिस जाते केवळ इच्छा केल्याने नव्हे. सिंह झोपूनच राहिला तर त्याच्या तोंडात पशू (हरणे वगैरे) आपोआप येऊन पडत नाहींत. त्यासाठी त्याला वनात हिंडून उद्योग करावाच लागतो. म्हणून प्रत्येकाने सतत उद्योगी रहावे हे उत्तम.

# अनुक्रमणिका जून १९८५


| | |
|---|---|
| १) संपादकीय | – तुम्ही साईबाबांचे भक्त आहात काय? |
| २) श्री प्रभाकरराव उदास | – साईनंद |
| ३) भाव विश्वातील लीला लाघव | – श्री. शं. ल. अवधूत. |
| ४) श्री उदीचा चमत्कार | – श्री व सौ. सुर्लकर. |
| ५) संत कबीरदास. | |
| ६) श्रीसाईनाथांची दृष्टी | – श्री. पु. कृ. धुपकर. |
| ७) साईकृपेचा अनुभव | – श्री. एस. जी. सावंत |
| ८) मला श्रद्धा लाभली | – सौ. आश्विनी चिपकर. |
| ९) ताजुद्दीन बाबांचा आशिर्वाद | |
| १०) श्री साईनाथांचा शरणार्थी –३ | – श्री. विश्वास खेर. |
| ११) श्रींची कृती हीच धर्माची शिकवण | – श्री. किशन कुलकर्णी. |
| १२) दिव्यत्वाची जेथे प्रचिती | – कमल गोरे |
| १३) समभावनेचे मेरुमणि – साईबाबा | – श्री. पां. वा. मुतकर. |
| १४) जया मनी जैसा भाव | – सौ. अंजली वरणकर |
| १५) सर्वांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता | – डॉ. अनिल मोरे. |
| १६) सदैव हृदयी वसे मनसि ध्यानी साई वसो | – श्री. रमेश चव्हाण |
| १७) श्रीसाईबाबांचे ब्राम्हतेज | – सौ. नीला अनिल रसाळ. |
| १८) द्वारकाधिश याचक | – श्री. वसंत वा. प्रधान. |
| १९) तुमचे साई विषयक सामान्य ज्ञान किती आहे? | – |
| २०) साई आनंदाचे स्थळ | – श्री. दि. दा. कुलकर्णी. |
| २१) क्षितीज मी शोधतो | – श्री. प्रकाश परब. |
| २२) अखंड धुनी | – डॉ. सौ. मालती राहाटे |
| २३) प्रभुकृपा | – श्री. दत्तात्रय म्हेतर |
| २४) श्रीसाईस्तुती | – श्री. द. गो. खळेकर |
| २५) आनंदाच्या हिंदोळयावर | – श्री. विजयकुमार चिंदरकर |
| २६) साई साई नाव घेता | – श्री. कृ. व्यं. हवालदार |
| २७) साई अमृत | – श्री. प्रल्हाद माळी |
| २८) साईदेवा | – डॉ. वाय. इत. हिव्वारे. |
| २९) श्री साई अभंग व स्तवन | – श्री. व्ही. इ. किरपेकर. |

# तुम्हीं साईबाबांचे भक्त आहांत काय ?

स. न. वि. वि.




सध्या जगात ढोंग, स्वार्थ व संधिसाधूपणा झाला आहे. खोटी आत्मप्रौढी व पोकळ डामडौलाने मिर-विणाऱ्या दांभिक भक्तीचे दर्शन पदो-पदी घडते. यामुळे मन विषण्ण होते. आज जग रहाटीच अशी झाली आहे की असंख्य भक्तांना आपले उद्योग, व्याप, कार्य या व्यतिरिक्त इतरत्र पुरेसे लक्ष देण्यास वेळच मिळत नाहीं. तरीपण आपण आपल्या कुटुंबात आपल्या घरात रहातो ते घर किंवा कुटुंब खऱ्याखुऱ्या अर्थाने गृहस्थाश्रमी माणसाचे घर आहे काय? गृहस्था-श्रमी माणसाचे घर म्हणजे तुमची काय कल्पना आहे आणि प्रत्यक्ष वस्तूस्थिती काय आहे?

घर म्हणजे केवळ निवारा देणाऱ्या चार भिंती व छप्पर नाही. ती निव्वळ भोजनाची किंवा विश्रांतीची जागा नाहीं. उपहार गृहातही या गोष्टी मिळतात.

कुटुंबातील सर्व मंडळी जेथे प्रेमाने संस्कारमय वातावरणात रहातात आणि स्वतःची मानसिक, बौद्धिक व आत्मिक उन्नती करुन घेतात ते खरे खुरे घर असे म्हणता येईल. [या दृष्टीने भक्तांनो, प्रथम आपल्या घराकडे पहा, भोजन, रहाणे, विश्रांती यापेक्षा तुमच्या घरात आणखीन काय काय होते बरे?

तुमच्या कुटुंबातील मंडळींना काहीं सामुदायिक असा बौद्धिक कार्यक्रम असतो का? चांगल्या ग्रंथाचे वाचन, सात्विक विषयावर चर्चा, विव्दान मंडळींचा घराशी संबंध यापैकी काहीं गोष्टी तुमच्या घरात होतात का? धार्मिक, नैतिक आणि अध्यात्मिक दृष्टीने तुमची जी काहीं मते असतील त्यांना अनुसरून सर्वांचा असा काहीं कार्यक्रम वर्षाकाठी निदान एकदा तरी होतो का? सामुदायिक

प्रार्थना, पूजा, उपासना, धर्मग्रंथ वाचन, चिंतन इत्यादी गोष्टींना काहीं ना काही स्वरूपात वाव तुमच्या घरात तुम्ही देता का? तुम्ही तुमच्या घरातून काही नित्य नैमित्तिक दानधर्म करता का? समाजातील रंजल्या गांजलेल्यांची आठवण तुम्ही कशा स्वरूपात ठेवता बरे?

तुम्ही काय किंवा तुमची मित्र मंडळी काय? किंवा तुमच्या कुटुंबातील मंडळी काय एखाद्याच्या आजारीपणात कुरकुर न करता परस्परांची सेवा सुश्रुषा करता काय? तुमच्या घरातील कष्टाच्या कामात सर्वांची भागिदारी असते काय याचा तुम्ही कधी शोध घेतला आहे काय?

तुमच्या काय किंवा तुमच्या घरातील मंडळींच्या सद्गुणांना अन्य मंडळी कितपत मान देतात? परस्परांच्या गुणांचे प्रेमाने कौतुक करतात, का एकमेकांना हिणवून नाउमेद करतात? दिवसाकाठी, आठवड्याने, महिन्यातून निदान वर्षा-काठी तरी आबालवृद्ध एकत्र येऊन सामुदायिक करमणूक व मनोरंजन करतात का? भक्तांनो, महत्त्वाची गोष्ट म्हणजे घरात शांत वातावरण आहे का सतत भांडण, कचकच, रागवा रागवी आणि चिडवा चिडवी चालू आहे याचा शोध घ्या.

ज्या घरात, कुटुंबात सद्भक्ति आहे, प्रेमाचा ओलावा आहे एकमेकांबद्दल आदर भाव आहे तिथेच खऱ्या खुऱ्या सद्गुणी सज्जन भक्तांची वाढ होते. तिथेच सत्पुरुष व साध्वी जन्म घेतात. चांगल्या संस्काराची माणसे तयार होतात अशा गोष्टी जिथे होतात तेच खरे खुरे घर आणि त्या घरातली मुख्य व्यक्ति हीच खरी साईभक्त असा आमचा समज आहे. नाहींतर ते घर नव्हे, कुटुंब नव्हे, परिवार नव्हे, भक्त नव्हे तर खानावळ नि खानावळीतील भोजनभाऊ होय.

तेव्हां साईभक्तांनो तुम्हांला खरेखुरे साईभक्त म्हणवून घ्यावयाचे असेल तर प्रथम आत्म संशोधन करा, आत्म निरीक्षण करा. एवढेच सांगावेसे वाटते.

★

## आदर्श श्रीसाईभक्त – १

श्री बाबांच्या तत्त्वप्रणालीचा अंगिकार करणारे भक्त –

# श्री प्रभाकरराव उदास

श्री. साईबाबांच्या केवळ भावभक्तिपेक्षां त्यांच्या आदर्श विचारसरणीचा अंगिकार व त्यांच्या उदात्त तत्त्वप्रणालीचा प्रसार–प्रचार करणाऱ्या अशा आदर्श सद्भक्तांचा परिचय अधून मधून करुन देण्याचे योजिले आहे.



० साईभक्तांनो आपण दररोज श्री बाबांची पूजाअर्चा करीत असाल, बाबांची पोथी वाचत असाल, बाबांना पुष्पहार घालून नवेद्य दाखवत असाल, त्यांची उदी भक्तिभावाने कपाळी लावत असाल [किंवा आणखीनही काहीं सेवा करुन बाबांची भक्ति करीत असाल] पण त्या सर्व मार्गापेक्षा अगदी वेगळया मार्गाने बाबांची भक्ती करणारे एक सज्जन मुंबापुरीत वावरत आहेत. साईबाबांची कृपा पात्र झालेल्या या भाग्यवान भक्ताचे नाव आहे श्री. प्रभाकर कृष्णाजी उदास. ते आज टाटा इलेक्ट्रिक कंपनीचे इस्टेट मॅनेजर या अती महत्त्वाच्या व जबाबदारीच्या जागेवर काम पहात आहेत.

श्री. उदास हे मूळचे देशावरचे. जुन्नर जवळच्या ओतुर गावचे. त्यांचा जन्म तिथे १३ सप्टेंबर १९२९ रोजी झाला. शिवाजी महाराजांनी जुन्नरला जेव्हां भेट दिली होती तेव्हां त्यांच्या वाड वडिलांनी त्यांचे स्वागत, आदरातिथ्य केले होते. त्यावर खूष होऊनच की काय महाराजांनी ३०० मोहरा उदास

घराण्यास त्यावेळी दिल्या होत्या. प्रभाकरांचे वडील कृष्णाजीपंत आपल्या अपत्यांना घेऊन नशीब काढण्यासाठी म्हणून ओतूरहून मुंबईला आले.

छोटया श्री. प्रभाकरपंतांना आपल्या परिस्थितीची जाणीव झाली व त्यांनी शिक्षणाकडे लक्ष देण्याचे ठरविले. माझगावच्या एली कदुरी हायस्कूलमधून १९४७ साली ते मॅट्रीक उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले व पुढे रुईया कॉलेजातून रसायन शास्त्र व पदार्थ विज्ञानशास्त्र हे विषय घेऊन ते बी. एस. सी. पदवीधर झाले. वडील मात्र त्यावेळी मुलांचे शिक्षण चालू असतांना टाटा पॉवर कंपनीत लँड ऑफिसर म्हणून नोकरीस होते. कंपनीच्याच जागेत परळला ते राहत व तिथेच त्यांची रहाण्याची सोय करण्यात आली होती.

पदवीधर झाल्यावर आणखीन पुढे शिक्षण घेण्याचा तरुण प्रभाकरपतांचा विचार होता पण टाटा सारख्या उद्योगपतींच्या लक्षात त्यांची प्रगती व हुषारी दिसून येताच त्यांनी त्यांना १९५३ साली नोकरीस ठेवून घेतले. व त्यांच्याच पुढे चोखपणे व अत्यंत प्रामाणिकपणाने कारभार पहात पहात ते आज या उच्च पदास पोचले आहेत. श्री. जे. आर. डी. टाटा व नवल टाटा हे तर त्यांच्या कामावर निहायत खूष आहेत.

श्री. प्रभाकर पंतांचा मूळ पिंड अध्यात्मिक बैठकीचा. परमेश्वराचे चिंतन, भजन, नामस्मरण ते लहान पणापासून करीत आलेले आहेत. कोल्हापूरची अंबाबाई व जेजुरीचा खंडोबा ही त्यांची कुलदैवते तर शिरडीचे साईबाबा हे आराध्य दैवत. दिवसाकाठी नामस्मरण व नमस्कार ते करतात, खरे पण हा पोकळ भक्तिभाव त्यांना पटत नाहीं असे दिसते. बाबांच्या श्रद्धा व सबूरीवर त्यांचा शंभर टक्के विश्वास आहे. पण याही पलिकडे जाऊन बाबांची तत्त्वप्रणाली व विचार चिंतन त्यांनी अंगिकारलेले आहे. अनाथ, अपंग, दीन दुःखीतांच्या झोपडपट्टीत जाऊन त्यांची जातीने ते विचारपूस करतात. पतितांचा उद्धार करण्याचे व्रत त्यांनी घेतलेले आहे. ज्या कुटुंबातल्या मुलांना शिक्षण घेण्याची मनापासून इच्छा आहे पण केवळ ऐपत नाहीं म्हणून ते मागे राहिलेले आहेत अशा गरीब, गरजू विद्यार्थ्यांची शालेयच काय पण कॉलेजच्या फीजसुद्धा ते भरतात. दरवर्षी दोन कुटुंबातल्या मुलांना शैक्षणिक कार्यासाठी हवी ती मदत पुस्तके, लेखन सहाय्य वहया इ. त्यांनी जातीने पुरवून आई-बाप, गुरुजी व साईबाबा यांचे नित्य नेमाने स्मरण करा अशी पुन्हां पुन्हां शिकवण ते देतात.

Scanned with OKEN Scanner

गेली काहीं वर्षे असा हा श्रीबाबांच्या खऱ्याखुऱ्या भक्तीचा कार्यक्रम त्यांनी चोखाळलेला आहे व यातच ते समाधान मानतात. भुकेलेल्यांना अन्नदान करणे, तहानलेल्यांची तृषा तृप्त करणे हे ते पवित्र कर्म समजतात.

श्री. उदास यांचा विवाह १९५९ साली झाला. त्यांच्या पत्नी सौ. लीलावती उदास या पूर्वाश्रमीच्या भुसावळ चे डॉ. खानापूरकरांच्या कन्या. उदास दांपत्याला दोन अपत्ये आहेत. कन्या कु. देवयानी पदवीधर झाल्यावर टाटा मेमोरियलमध्ये बायोकेमिस्ट आहे तर चिरंजीव दत्तात्रय हा बी. ई. मेकॅनिकल इंजिनियर होऊन विलायतेला जाण्याच्या तयारीत आहे. बाबांच्या आदेशाचे आपण पालन करीत आहोत व तेही शांतपणाने कोणताही गाजावाजा न करता व यामुळेच की काय बाबांची आपल्या घराण्यावर कृपा दृष्टी आहे असे उदाससाहेब नेहमीच सांगतात.

श्री. उदास यांचे तिन बंधूही उच्चविद्या विभूषित असून ते पण जबाबदारीच्या जागांवर आज काम पहात आहेत. मराठी समाजाप्रमाणेच पारशी समाजातही श्री. उदास यांचा वावर जास्तच असल्याने पारशी समाजात एक साधे सज्जन, उदार वृत्तीचे भक्त म्हणून त्यांचा खूप बोलबाला आहे. इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी या भाषा ते उत्तम लिहितात – बोलतात. ते स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेटही आहेत व आपल्या अधिकाराचा उपयोग ते जनतेसाठीच करतात. लेण्याद्री या अष्ट विनायकातील गणपतीचे पुनरुद्धाराचे पवित्र कार्य त्यांनी सध्या हाती घेतलेले आहे. श्रीसाई त्यांना परोपकाराची बुद्धी अशीच देवोत ही प्रार्थना.



# भाव विश्वातील लीला लाघव-संतसमागम :

—श्री. शं. ल. अवधूत
रावतपारा, जयंत भुवन,
जगदलपूर (बस्तर – म. प्र.),
पीनकोड – ४९४००१.

० उत्कट मनातील गाढ उद्रेकांच्या स्फूर्तीतून] जन्म पावलेल्या वृत्ती जर सात्विकतेवर आधारीत असतील तर त्या आपल्या ध्येयापर्यंत निश्चित जावून पोचतात. इच्छाशक्ति प्रबळ असली तर चंचल मनावर त्यांचा यत्किंचितही परिणाम होत नाही. परंतु त्याकरिता मनाची खंबीर तयारी पाहिजे. कारण मन हे पाण्यासारख्या तरल पदार्थाप्रमाणे गतीशील असते. त्याला जसे प्रवाहित करू त्याप्रमाणे ते धावत असते, ज्याप्रमाणे आकार देवू त्याप्रमाणे त्याचे रूपांतर होत असते आणि ज्या परिस्थितीत त्याला आपण ढाळू ती परिस्थिती ते निर्माण करु शकते. सार आणि असार परमाणूंनी त्यांच्या अस्तित्वाचे धागे विणलेले असतात. जागृतावस्थेत असलेल्या असार गोष्टींचा त्यात भरणा जास्त असतो तर निद्रितावस्थेत असलेल्या सार गोष्टी चैतन्याने जोपर्यंत स्फुरित होत नाहीत तोपर्यंत जड अवस्थेत असतात. सद्सद्विवेक हा मनुष्याचा एक मोठा आविष्कार होय सद्सद्विवेकाच्या चाबकाने खरा मानव असार गोष्टींना झोडपून दूर पळवून लावतो तर सार आणि स्पृहणीय गोष्टींना जवळ आणवून त्यांचा लाभ्यांश पदरात पाडून घेतो. दुसऱ्या प्रकारची वृत्ती जर वाढीला लागली आणि तिची सार्थकता जर पणाला लावली तर परमोच्च सायुज्जता गाठावयाला मनुष्याला वारंवार जन्म घ्यावे लागत नाहीत, किंबहूना तो जन्म—मरणाच्या निरंतर येणाऱ्या फेऱ्यातून कायमची मुक्ती पावतो परंतु असे भाग्य प्राप्त होणे एखाद्याच्याच नशिबी असते, त्याला पूर्व जन्मांची पुण्याई लागते, मागील जन्मात केलेल्या सत्कृत्यांचा आधार लागत असतो, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संत महात्म्यांचा आणि सद्गुरुचा कृपा—आशिर्वाद व सान्निध्याची जोड लागत असते. मृगजळाप्रमाणे असलेल्या असार गोष्टी आपल्याला आपल्या ध्येय-निष्ठ लक्ष्यांप्रत पोचू देत नाहींत तर उलट मार्गाकडे नेण्याचा त्यांचा अबाधित क्रम चालू असतो. त्या मृगजलांतील डोहात सर्वसाधारण मनुष्य गटांगळ्या खावयाला लागला की त्या त्या आसुरी वृत्तींना परमानंद होतो आणि त्याचे

तांडवनृत्य तेव्हांच संपते की त्यावेळी मनुष्याचे अस्तित्व नामशेष होवून बसले असते. प्रश्न असा उठतो की वरील गोष्टींना कारणीभूत कोण?

माझ्यामते वरील अधोगतीला केवळ मानवच कारणीभूत आहे कारण सद्‌बुद्धीचा उपयोग न करता आपले अखंड हीत कशात साठविलेले आहे याचा विचार न करता, सार–असार गोष्ट काय आहे त्याचा आढावा न घेता क्रमाक्रमाने पण निश्चितरित्या अधोगतीकडे तो वाटचाल करु लागतो. आसुरी किंवा पैशाचिक वृत्ती जन्मतःच क्रूर असल्यामुळे त्या आलेल्या संधींना पाठ दाखवित नाहींत. उलट त्यांना मार्गात सापडलेल्या अशा प्रत्येक वस्तूची आवश्यकता असते आणि योग्य संधी येताच त्याचा लाभ घ्यावयाला त्या चुकत नाहीत. असार गोष्टींवर विजय मिळविणे हे मानवाचे प्रथम कर्तव्य आणि तो मिळविण्याकरिता दुर्दम्य साधनेची एकाग्रतेची आणि सर्वात श्रेष्ठ सद्‌गुरुची कृपा मिळविणे ही दुसरी अत्यंत महत्त्वाची बाब होय. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे 'सद्‌गुरु कृपेवीण काही भव तरणोपाय नाहीं' ह्यालाच दुसऱ्या शब्दात म्हणावयाचे म्हणजे संसार सागरातून जीवन नौकेला जर पार लावावयाचे असेल तर मनुष्याला संत समागमाची नितांत आवश्यकता असते. संत समागम किंवा सतसंग लाभल्याने मनुष्याच्या जीवनाचे सार्थक होते, तो साधकाचा मार्ग चालू लागतो, एवढेच नव्हे तर ऋद्धि–सिद्धि सारख्या तात्कालीक सुख देणाऱ्या गोष्टी त्याच्या पायावर लोळण घ्यावयाला आतूर होतात, परंतु ऋद्धि–सिद्धी सारख्या गोष्टींची प्राप्ती करुन घेणे हे मनुष्याचे ध्येय नव्हे कारण त्यात कायमचे गुंतवून घेणे म्हणजे जीवन मरणाच्या द्वैते जोडीत परत कोंडून घेण्यासारखे घातक ठरेल.

मृगजळ दिसावयाला कितीही सुंदर असले तरी ते वास्तविक नसते, जसजसे आपण पुढे जावू तसतसे ते आपणां पासून दूर पळत असते आणि त्याचा कधीच लोप होत नसतो. आसूरी प्रवृत्तींचा नाश व्हावा म्हणून आणि परमोच्च सायुज्यतेची प्राप्ती व्हावी म्हणून संत–महात्मे भूतलावर मधून मधून उत्पन्न होतात, आणि आप–आपल्या परीने जनता जनार्दनाचे मार्ग–दर्शन करतात. ते अयोनी संभव असतात त्यांना जन्म–मरणाचा काहींहि हेतू बाध्य करू शकत नाहीं. अखिल ब्रम्हांडात यावरून त्यांचे सान्निध्य केवळ परमोच्चपदा शेजारी असते. विवेकाचा वापर करून अशा प्रकारच्या महात्म्यांना जाणून घेणे आणि त्यांना शरण जावून त्यांचे मार्गदर्शन स्विकारणे हे मानवाचे सर्वश्रेष्ठ कर्तव्य

होय, निश्चितच आपले ध्येय आपल्याला प्राप्त होईल आपल्याला करावयाचे इतकेच की त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागून पूर्ण श्रद्धेने त्यांचा अंगीकार करणे.

सृष्टीच्या जन्मापासून आजच्या कलीयुगापर्यंत बरेच संत-महात्मे आणि देव-अवतार होवून गेलेत आणि त्यांनी आपले कार्य केले. कस्तुरीमृगा जवळ कस्तुरी असते याची त्याला जाणीव नसते, तो रानोमाळ भटकत असतो. एकाच जागी तो फिरून फिरून येतो परंतु त्याला ती दिव्य-संजीवनी सापडत नाहीं. संत-महात्म्यांच्या समागमाने किंवा कृपेने मनुष्याच्या देहातच असलेल्या परमेश्वराची प्राप्ती होऊ शकते. परंतु, मनुष्याला त्याची जाणीव नसते. तो सारखा भटकत असतो. 'तुझे आहे तुजपांशी परंतु जागा विसरलासी' त्याची जाणीव केवळ संतानांच असते आणि त्यांच्या कृपेला पात्र झालेल्या मानवी देहांना त्याचा लाभ मिळतो. संत समागमाने पुनीत झालेली आणि त्यांच्या मागदर्शनाने परमोच्च पदाला प्राप्त झालेली बरीच उदाहरणे आपल्याला पहावयाला मिळतात, अनुभवावयाला येतात. एकावेळी वाल्याकोळी, चोर दरोडखोर खुंखार डाकू होता, त्याने आयुष्यात बरीच हत्या केली होती. जीवन मरणाच्या संघर्षात तो एवढा एकाग्र झाला होता की जगात दुसरे एखादे भव्य, उदात्त आहे याबद्दल त्याला कल्पना नव्हती, परंतु परमेश्वराच्या इच्छेने त्याला सर्वश्रेष्ठ संत नारदांची भेट झाली आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली तो परमोच्चपदाला गेला. वाल्या कोळचाचा वाल्मीकी ऋषी झाला. आपल्या अत्युच्च कृतींनी तो जगाला ललामभूत ठरला, त्याची साधना सफल झाली.

संतांची परंपरा अव्याहत चालू असते आणि त्यांच्या स्वयंभू प्रकाशाने चारही दिशा प्रभावित होतात. रामायण काल सोडून आधुनिक जगातही संतांचा प्रभाव अत्यंत आविष्कारक ठरला आहे हे विचारांती आपल्याला पटते. संतकवी रामदास वरील दृष्टीने आपल्याला प्रेरक होवू शकतात. प्रखर तेजःस्विता, अगाढ चिकाटी आणि साधनेची उत्कटता वरील गोष्टी त्यांना आत्मसात असल्यामुळे रामदास जगाला आदर्श होवू शकले. त्यांचा भक्त समुदाय बराच मोठा होता. त्यात त्यांचा एक आवडता शिष्य भोलाराम. नावाप्रमाणेच तो प्राणी अत्यंत साधाभोळा होता, जगाच्या कुत्सीत डावफेकाची त्याला जाणीव नव्हती. अगदी अनभिज्ञ लहान मुलांसारखे कोवळे मन असलेला. त्याचा सरळ नाकापुढचा भाव पाहून रामदासांचे अंतःकरण गहिवरले, त्यांना त्याची करुणा आली आणि दयेने प्रेरित होवून रामदासांनी भोलारामावर आपल्या कृपादृष्टीची

पसरण केली. निष्ठावान असल्यामुळे व रामदासांचे मार्गदर्शन असल्यामुळे कालांतराने साध्याभोळ्या भोळारामाला प्रत्यक्षात श्रीरामाचे, लक्ष्मणाचे, सीतेचे आणि हनुमानाचे दर्शन झाले. भोळारामाचे ध्येय त्याला सहजरित्या प्राप्त झाले, त्याचा जीवनाचा उद्धार झाला.

संतांचे आगमन होत असल्यामुळ आणि त्यांच्या दिव्य संदेशाची अंमलबजावणी होत असल्यामुळे भारताचे पावित्र्य टिकून आहे चालू काळाचे उदाहरण घ्यावयाचे म्हणजे महात्मा स्वामी रामकृष्ण परमहंसांचे; परमहंसांनी आपले हयातीत जो अध्यात्मिक क्रांतीचा नारा दिला तो किती स्पृहणीय होता हे त्यांचे चरित्र पठण, चिंतन आणि मनन केल्याने शोधावयाला दूर जावे लागत नाही. तो तारा आकाशात चमकला, आपल्या ध्येयनिष्ठेने साधनेने परंपरावादी भारताला त्याने मानाचे स्थान मिळवून दिले आणि ती प्रकाश किरणांची ज्योत अनंतात विलीन झाली, परंतु मनुष्याला सद्भावनेचे सिंचन करुन आणि आपल्या अमृतवाणीने सावधान करुन जागृत, उत्तिष्ठ, प्राप्तवरान्तबोधीत. स्वामी परमहंसांची वाणी अमर होती, अमर आहे आणि काळ जोपर्यंत तीचे विस्मरण करीत नाही तोपर्यंत ती अजरामर राहिल. नरेन्द्र देव हा स्वामी रामकृष्णांचा शिष्य. एका प्रखर ध्येय भावनेने संमोहित होवून नरेन्द्राने रामकृष्णांची कांस धरली. अगोदर तो देखिल थोडासा शंकांकुल होता परंतु स्वप्नावस्था भग झाल्यानंतर परमहंसांचे खरे रुप त्याला दिसू लागले. तो त्यांच्या छायेप्रमाणे त्यांच्या पुढे मागे चालू लागला· रामकृष्णांनी नरेन्द्राचा खरा भाव जाणून त्याला आपल्या जवळ केले, आपल्या दिव्य ज्योतीचे किरण त्याच्या शरीरात पसरू दिलेत आणि आपला वरदहस्त त्यांनी साधक नरेन्द्राच्या डोक्यावर ठेवला. नरेन्द्राच्या शरीरात वीज चमकली आणि तिने त्याचे पूर्ण शरीर आवळून घेतले.

सिद्ध–साधक योग किती प्रखर आणि अविभाज्य असतात ह्याचे प्रत्यक्षात उदाहरण म्हणज स्वामी रामकृष्ण परमहंस आणि समकालीन नरेन्द्रांचे अद्वितीय मिलन. पुढे नरेन्द्रांचे रूपांतर स्वामी विवेकानंदांत झाले. स्वामी विवेकानंदांच्या माग स्वामी रामकृष्णांची प्रेरणाशक्ति असल्यामुळे ज्या ज्या ठिकाणी विवेकानंद गेले त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या ओजस्वितेचे आणि भारताच्या अस्मितेचे तेज पसरविले. केवळ भारतातच नव्हे तर जगड्व्याल प्रवास करून पाश्चात्य देशातही त्यांनी आपल्या अजेय ज्ञानाने आध्यात्मिक शक्तिचे प्रयोग सफलतापूर्वक पार पाडले. केवळ शून्यातून पूर्ण ब्रम्हाची उत्पत्ती कशी झाली आणि

कालांतराने त्याचे प्रसारण कसे कसे होत गेले ह्याची जगदविख्यात मिमांसा त्यांनी आपल्या स्पष्ट शब्दात केली. स्वामी रामकृष्णांसारखा संतांचा त्यांना पाठिंबा होता, आशिर्वाद होता आणि तितक्याच प्रमाणात त्यांना परमहंसांचा समागम घडला आणि म्हणूनच स्वामी रामकृष्ण व शिष्य स्वामी विवेकानंद यांच्या दिव्य ज्योती जरी आज दृष्टीगोचर होत नसल्या तरी त्या आपआपल्या-परी तेवत आहेत, आजही त्या अजरामर आहेत.

संत गाथेचे वर्णन करताना हे सांगणे अत्यंत आवश्यक आहे की, संत-समागमाच्या किंवा सत् संगाच्या दृष्टीने श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथांचे स्थान अढळ ठरेल. साईनाथ कोठून पृथ्वीतलावर आले, ते कोणत्या जातीचे किंवा धर्माचे हे कोडे कोणालाच उलगडले नाहीं. पूर्ण विचारांती त्यांना अयोनी-संभव म्हणणेच सयुक्तिक होईल. त्यांची मानवजात होती आणि संपूर्ण मानवता हा त्यांचा धर्म. धन्य ते लोक की ज्यांना साईनाथांचा सहवास मिळाला, ज्यांनी त्यांची आशिर्वादकृपा संपादन केली, त्यांचे मार्गदर्शन घेतले, आणि त्यांच्या सहवासात उपदेशामृताचा लाभ प्राप्त करुन घेतला. सद्गुरु साईनाथांच्या हयातीत बरेच दैवी चमत्कार घडलेत किंवा चमत्कार त्यांनी लोकोद्धारार्थ घडवून आणले हे सांगणे कठीण असले तरी 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, देह कष्टविती परोपकारे, हे निर्विवाद सत्य आहे. प्राणीमात्रांवर दया दाखवून साईनाथांनी त्यांचा उद्धार केला, जनमानसात आपल्या वाणीने मोक्षप्राप्तीचा मार्ग सरळ करून सांगितला. भक्तिमार्गाची महत्तता प्रतिपादित केली आणि मोठमोठी परकीय संकटे आपणांवर ओढवून घेवून भक्तांना संकटमुक्त केले. सद्गुरु साईनाथ त्रिकालज्ञानी संत होते, आपल्या भक्तांचे रक्षण करण्याकरिता त्यांनी पूर्ण हयात घालविली आणि आपल्या यौगिक शक्तिने लोकांना चकित केले. सद्गुरुंनी समाधी घेतल्यापासून आतापर्यंतचा काळ परोपकारार्थ खर्च केला. आजही जे कोणी अनन्यभावाने त्यांना शरण जातात त्यांच्या त्यांच्या शुद्ध भावाला ओळखून सद्गुरु त्यांच्या मदतीला धाव घेतात. श्रद्धा आणि सबूरी या दोन महामंत्रांनी प्रेरित होवून निस्वार्थरितीने भक्ती केल्यास परमेश्वराची प्राप्ती होवू शकते हे सत्य त्यांनी लोकांना पटवून दिले.

जगाच्या भूगोलात भारताचे एक विशिष्ट स्थान आहे. इतर कोणत्याही दृष्टीने भारत जरी दुसऱ्या अनेक देशांच्या मानाने मागासलेला असला तरीपण आध्यात्मिक दृष्टचा त्याची पातळी हिमालयाच्या अत्युच्च शिखराच्याही फार

उंच आहे आणि म्हणूनच त्याचे (भारताचे) अस्तित्व निर्बाधित आहे. भारताची ही शिखरपातळी जगातील कोणताही देश उल्लंघू शकणार नाहीं. कारण त्यातील ज्ञानभंडार अशा प्रकारचे आहे की, त्यातून कितीही निरसन झाले तरी त्यात त्या ज्ञानात कधीही तुटवडा पडणार नाहीं. उलट ते निरंतर वाढीला लागेल, भारताची अस्मिता सदैव उज्वल, अबाधित राहील. संतसमागम किंवा सत्संग भारताला लाभलेले अद्वितीय लेणे आहे आणि जोपर्यंत भारत जीवंत आहे तोपर्यंत हे लेणे आपल्याला सोडून दुसरीकडे जाणे शक्य नाहीं. कारण ते भारतीयांच्या विशाल मनाप्रमाणे विशाल आहे. उत्तुंग आहे आणि तितक्याच प्रमाणात परंपरागतरित्या निश्चल आहे. ।।हरि ओम ।।

श्री सुर्लीकर पतीपत्नीचे अनुभव –

## श्री उदीचा चमत्कार

–श्री. क. वि. सुर्लीकर.
"गणेश भुवन", रामनगर,
डोंबिवली (पूर्व), ४२१ २०१.

० डिसेंबर १९८४ मधील गोष्ट. मजला बसावयाचे जागी छोटा जोंधळ्या एवढा फोड आला. २–४ दिवस दुर्लक्ष केले. दुखत होता व ठणकत पण होता. पाटावर बसणे पण कठीण झाले. त्यात देवांची पूजा अभिषेक करावा लागे याला साधारण १–१।। तास लागावयाचा म्हणून आता गप्प बसून उपयोग नाहीं तर डॉ. चे कडे जाऊन उपचार घेतला पाहिजे. डॉ. नी सांगितले की हे 'गळू' आहे व दवाखान्यातच (रुग्णालयात) जाऊन कापावे लागेल. मी मधुमेहाचा गेली ३ वर्षे रुग्ण आहे त्यामुळे ऑपरेशन नको या मताचा. शिवाय "बाबा" वगैरे अशा गोष्टींवर कमी विश्वास. देवावर श्रद्धा आहे पण या असल्या उदी–अंगारे–धुपारेवर कमी विश्वास, त्यातून गळवाने आपला आकार मोठ्या बोरा एवढा केलेला. ठणका सतत. त्यामुळे ऊठ, बस, त्रासाची झोपपण लागेना. हैराण, हैराण झालो. औषधावरचा पण विश्वास उडाला. सौ. तीला माझ्या वेदना पहावत नव्हत्या. शेवटी सौ. ने सुचविले की, आपण "बाबांची" उदी त्यावर रोज लावू म्हणजे तेच यातून तुम्हांला मुक्त करतील. मग मी "उदीचे"

रोज गळ्यावर सिंचन करु लागलो. पाण्यातून पोटात घेऊ लागलो. कपाळी पण लावू लागलो. बघू या तर खरे! ७–८ दिवसांनी माझा तो आजार कमी कमी होऊ लागला. व १०–१२ दिवसात मी, खडखडीत बरा झालो. नंतर डॉ. ना पण पुन्हां दाखविले त्यांनी सांगितले की गळ्याचा मागमूस नाहीं. यामुळे माझी 'बाबांचे' वर श्रद्धा बसली. नित्य नियमाने रोज मी त्यांना नमस्कार करतो. उदी कपाळी लावतो बाबांचे स्तोत्र पण पठण करतो. डॉ. चे औषधाने न बरी होणारी पण "उ दिचे" रोज गळ्यावर सिंचन केल्याने मी व्याधीमुक्त झालो. मित्रानों तुम्हीपण बाबांवर श्रद्धा ठेवा व बाबांचे चरणी लीन व्हा.

**प्रभावी उदी –**

० १९८४ सालची रामनवमी होती. सकाळी ६ चे सुमारास मी फिरा-वयास गेले होते. परत येतांना मला ठेच लागून मी सपशेल पडले. तळहातास बरेच खरचटले. दोन्ही गुडघ्यांना मार लागला. पण जखम अशी नव्हती. लंगडत लंगडत घरी आले. सायंकाळी दवाखान्यात गेले. इंजेक्शन घेऊन वर पोटात घेण्यास गोळ्या पण डॉ. नी दिल्या. हाताचे खरचटलेले बरे झाले. डावा गुडघा पण सूज उतरून बरा झाला वेदना कमीं झाल्या पण ४–५ दिवस उपचार करुन उजवा गुडघा दाद देईना. सूज कमी न होता वाढू लागली. घरात पाव्हणे आलेले, घरकाम करणे त्रासाचे होऊ लागले, डॉ. नी सांगितले की, "तुमच्या गुडघ्यात पाणी झालेले आहे ते मोठ्या दवाखान्यात जाऊन ऑपरेशन करुनच काढावे लागेल. हे ऐकून मी तर मनात घाबरले, एक तर मला मधु-मेहाचा विकार अन् त्यात हे ऑपरेशन. किती दिवस लागतील बरे व्हायला? दवाखान्यात किती दिवस रहावे लागेल? जखम बरी नाहीं झाली तर? अनेक शंकानी मनात ठाण मांडले. घाबरुन गेले. ऑपरेशन हाच एकमेव उपाय असे डॉ. चे मत. घरी आले. श्री साईबाबांचे फोटोपुढे येऊन करुणा भाकली. त्यांची उदी रोज दिवसातून ३–४ वेळा गुडघ्याला लावायची. तोंडात घ्यायची व कपाळी लावायची असा क्रम ७–८ दिवस चालू होता. नंतर सूज व दुखणे कमी झाले. डॉ. नी तपासले व सर्व ठीक आहे. गुडघा चांगला आहे असे म्हणाले. मित्रानों ही माझ्या बाबांची कृपा. त्यांच्या सेवेचे फळ व माझे त्यांनी उदीने दुखणे बरे केले.

श्री समर्थ सद्गुरु साईबाबांना माझे शतशः प्रणाम अर्पण करीत आहे.

☆

श्री कबीर जयंती निमित्य खास माहिती पूर्ण लेख –

जनता जनार्दनाला उपदेश करणारा महात्मा –

# ....संत श्री कबीर....

० महाराष्ट्रात ज्याप्रमाणे श्री संत साईबाबांना मान दिला जातो त्याचप्रमाणे उत्तर व मध्य प्रदेशात संत कबीर यांचे बद्दल अत्यादर दाखविला जातो. त्यांची भूमिका चतुर्विध आहे. ते प्रथम एक उच्च कोटीचे प्रेषित होते आणि मग हिंदू व मुसलमान यांच्या एकतेचे पुरस्कर्तेच होते. संवत १४५७ ते संवत १५७५ हा कबीरांचा आविर्भाव काल होय. ते सुलतान शिकंदर लोदी यांचे समकालीन. पण त्याने त्यांचा अमानूष छळ केला. कबीर १२० वर्षांचे होऊन दिवंगत झाले.

कबीरांच्या मातेचे नाव नीमा व पित्याचे नाव नीरू. ते काशीचे रहिवासी व जातीने मुसलमान कोष्टी. नीमा व नीरु हे कबीरांचे जन्मदाते नव्हेत असा अपसमज आहे. कबीरांचा जन्म एका ब्राम्हण विधवेच्या पोटी झाला. समाजाच्या धाकामुळे तिने आपले हे अर्भक लहरतारा तलावात टाकून दिले. सुदैवाने ते नीमा–नीरुना सापडले, व त्यांनी ते अपत्यवत मानून त्यास लहानाचे मोठे केले. पण वस्तुतः या समजूतीत तथ्य नाहीं. कारण कबीरांच्या काव्यात आपण कोष्टी असल्याचा उल्लेख आहे पण विधवा ब्राम्हणीचे पुत्र असल्याचा उल्लेख नाहीं. ते स्वतःचा उल्लेख 'जुलाहा' (कोष्टी) असा करतात. कबीर हे कुणाचीही भीड मूर्वत न ठेवता सत्य हे कटु व 'अप्रिय' असलं तरी ते बोलून दाखविणारे होते.

कबीर हे जन्मतःच धार्मिक वृत्तीचे. त्यांना कथा, कीर्तने, प्रवचने इ. ऐकण्याची आवड. ते मुसलमान असूनही त्यांच्या काव्यावर हिंदुत्वाचा प्रभाव आहे याला कारण काशी सारख्या पुण्य क्षत्रातील त्यांचे वास्तव्य. शिवाय त्याकाळी मुसलमानांच्या राजकीय वर्चस्वाच्या जुलमाला कंटाळून नाखुशीने धर्मांतर केलेले हिंदु पुष्कळ असत. ते जरी बाटले तरी त्यांच्या घरातील आचार विचार पूर्वापार चालत आलेल्या प्रमाणेच होते. नीमा व नीरु यांचे घराणे कदाचित अशा प्रकारचे असावे. व त्याच वातावरणात कबीर वाढले म्हणून त्यांचेवर हिंदु संस्कार झाले असावेत.

(पान ४९ वर पहा)

# श्री साईनाथांची दृष्टी व सर्वधर्म समन्वय

************************

-श्री. पु. कृ. धुपकर,
२१७-६ जवाहर नगर
गोरेगांव, मुंबई ६२

० श्री साईनाथ एक अवतारी महापुरुष होते. ह्या अवतारी महापुरुषाचे कार्य केवळ एकाच धर्मापुरते सीमित नव्हते. सर्व धर्म समन्वय हे खरे त्यांचे अवतार कार्य होते. सर्व भारतीय संतांनी आपल्या कार्याचा प्रभाव जनमानसा वर उमटविला. तथापि श्री साईनाथांनी याच विशाल तत्त्वज्ञानाचा वारसा घेऊन भारतातील विविध धर्मीयांना समन्वित करण्याचे थोर कार्य केलें. भार तीय साधनमार्गातील कोणतीही परंपरा असो, तिला औपनिषदिक तत्व ज्ञानाचा डोळा प्राप्त झालेला आहे असेच सर्वत्र दिसून येते. श्री साईबाबांची तत्त्व दृष्टी 'ईशावास्यमिदजगत्' ह्याच विचारसरणीत चोख बसते. सर्व प्राणीमात्रात ते स्वतःलाच बघत होते. जिथे सांप्रदायिकता डोकावू पाही तिथे त्यांनी काहीसां रुद्रावतारच धारण केला. 'वसुधैव कुटुंबकम्, हीच त्यांची अंतिम दृष्टी होती.

श्री साईबाबांचे द्वारकामाईत सतत वास्तव्य असणे, त्या मशिदीतच घंटा आवर्जून टांगायला लावणे व रामनामाचा गजर करणे, ही त्यांची कृती व सतत मुखातून "अल्ला मालिक है" असे म्हणत भक्तांना आशिर्वाद देण ही त्यांची वृत्ती वरकरणी सामान्य दृष्टीला विसंगत वाटेल. मीच पर ब्रम्ह आहे याचा अनुभव त्यांनी घेतलेला आहे. राम आणि रहीम अेकच आहेत. प्रेम हेच माणसाला मनुष्यत्त्वाच्या कोटीतून परमात्मा तत्त्वाच्या कोटीपर्यंत पोचविते. ह्याच भावनेने श्रीसाईबाबा सर्वांना परस्परांवर, सर्व प्राणीमात्रावर प्रेम करावयास सांगत. सर्व धर्म, पंथ, संप्रदाय हे साधन मार्ग आहेत. कोणीही व्यक्ति पूर्वजन्मातील कार्यकारण संबंध असल्याशिवाय एक-मेकांजवळ आकर्षित होत नाहीत. म्हणून कोणीही व्यक्ति अगर प्राणी जर योगायोगाने आला तर त्याला लगेंच झिडकारुन दूर लोटू नका. त्याच्याशी प्रेमाने दोन शद्ब बोला. श्री साईबाबा हे पूर्ण अंतर्ज्ञानी होते. दानधर्म करताना तुमची इच्छा नसली अगर ऐपत नसली तर खुशाल गप्प बसा. कांहिही देऊ घेऊ नका. पण भिक्षा मागण्याकरिता आलेल्या कोणाही व्यक्तिला निष्ठूरपणे

झिडकारु नका. त्याच्या मनावर आघात होईल असे बोलू नका. तुमची कोणी निंदानालस्ती केली तर उलट शिव्यांची लाखोली वाहून आपली अवनती करुन घेऊ नका. फक्त मन शांत ठेवा. (हेच काम मोठे कठीण आहे) मन शांत ठेवण्याला, मनस्थीर करुन नामस्मरण, श्रीसाईच्या गोड आठवणींचे मनन चिंतन करत आपले कार्य करत रहा. श्रीसाईबाबा ह्यामुळे सतत आपल्या पाठी मागे आहे असे तुम्हास वाटू लागेल. श्रीसाईबाबा शिरडी सोडून कोठेही गेले नाहीत, पण त्यांची दृष्टी आपल्या सर्व भक्तांवर सदोदीत राहत असे. आपला भक्त जरी सातासमुद्रा पलीकडे असला व त्याने आर्ततेने हाक मारली की, श्रीबाबा कोणत्यातरी रुपाने त्याचे संकट निवारण करतातच.

श्री. जहांगीर फरामजी दारुवाला हा श्रीबाबांचा एक भक्त. ह्या भक्ताने श्री साईनाथांची बऱ्याच जणांकडून किर्ती ऐकली होती. त्यामुळे त्याने आपल्याजवळ श्रीबाबांचा फोटो ठेवलेला होता. तो नौदलांत कॅप्टनच्या हुद्यावर होता, व त्याच्या हाताखाली बऱ्याच नौका होत्या. रसो–जपानी यद्धाच्या प्रसंगी ह्याच्या बहुतेक नौका बुडाल्या. फक्त तीनच नौका शिल्लक राहिल्या. पण त्याही वाचविण्याची शक्यता दिसत नव्हती. शेवटी त्याला श्रीबाबांची आठवण होऊन त्याने आपल्या खिशातील श्रीबाबांचा फोटो बाहेर काढला. त्यास नमस्कार करुन मनोभावे श्रीबाबांची करुणा भाकली, व आपल्या राहिलेल्या तीन नौका वाचविण्याची प्रार्थना केली. द्वारका माईत बसलेल्या श्रीबाबांनी त्याची प्रार्थना ऐकली; व ते भक्त संकट निवारणार्थ धावून गेले. त्यांनी त्या तीन नौका सुरक्षितपणे किनाऱ्यास लावल्या.

इकडे द्वारकामाईत बसलेल्या श्रीबाबांची संपूर्ण कफनी व डोक्यास बांधलेले फडके ओलेचिंब होऊन त्यातून पाणी निथळू लागले. जवळजवळ अर्धातास श्रीबाबांच्या कपड्यातून पाणी निथळत होते. द्वारकामाईत सर्व ठिकाणी पाणिच पाणी दिसत होते. कै. तात्या कोते ह्यांनी श्रीबाबांना विचारले "हे काय बाबा" भक्त संकटात होता म्हणून त्याला त्यातून बाहेर काढण्यासाठी मी पोहून आलो आहे !

ह्या घटनेनंतर तिसरे दिवशी जहांगीर कडून श्रीबाबांना आभार प्रदर्शक तार आली. भारतात परतल्यावर तो प्रथम शिरडीस श्रीबाबांच्या दर्शनास आला. पुढे त्यास दुसरीकडे मोठ्या हुद्याची नोकरी लागली.

श्री साईबाबा नेहमी "अल्लामालिक" "अल्ला भला करेगा" असे म्हणत असत. त्यामुळे काही कट्टर धर्मवेड्या मुसलमानांची समजुत झाली की, श्री बाबा हे मुसलमान आहेत. त्यामुळे येथेही ते परधर्म असहिष्णुता, विघ्न संतोषी वृत्ती, हिंदु धर्माबद्दलची द्वेष भावना. विविध प्रकाराने प्रकट करु लागले. श्रीबाबांची पुजा आरती होत असे हे हिंदुचे पूजा उपचार पाहून हे पाप घडते आहे व हे आपल्या बाबांना ह्या कृत्यात सहभागी करुन पापाचे धनी बनवीत आहेत असे तेथील कडव्या मुसलमानांना वाटे. म्हणून श्रीबाबांना सांगून आरती बंद करण्याचा प्रयत्न करुन पाहिला. पण त्यात त्यांना यश आले नाही. तेव्हां त्यांनी संगमनेरहून आपल्या "काझीला" शिरडीस आणले व त्याच्या नेतृत्त्वाखाली हाती लाठ्या घेऊन ही "धर्ममार्तंड" मंडळी मशिदीचे द्वार द्वारकामाईचे प्रवेशद्वार रोखून उभी राहीली. श्रीबाबांच्या पूजा आदरा साठी कोणाही हिंदुला आत प्रवेश करु द्यायचा नाही हा त्यांचा निर्धार नेहमीप्रमाणे प्रातःकाळी म्हाळसापती श्रीबाबांची पूजा करण्यास आले पण तेथील सशस्त्र बंदोबस्त पाहून तो दूरच थबकला. त्यांनी दुरुनच श्रीबाबांची मनोभावे प्रार्थना केली. आता तो परत वळणार तोच श्रीबाबांनी त्यांना हाक मारली व बाहेर उभ्या असलेल्या मंडळीवर आपली दृष्टी नजर टाकली. आज्ञेप्रमाणे म्हाळसापती द्वारकामाईत गेले व पूजा करु लागले. हा प्रकार पाहताच बाहेरील बहाद्दर मंडळी एकमेकांकडे पाहू लागली. श्रीसाईनाथांच्या दृष्टीक्षेपामुळे त्यांना त्यांचा हातही उचलेनासा झाला. थोड्याच वेळात त्यांनी तेथून काढता पाय घेतला.

असाच एक मुसलमान फकीर बराच काळ श्रीबाबांच्या जवळ होता. पण खऱ्या धर्माचे रहस्य जसे त्यास उमगले नाही तसेच श्रीबाबांचे खरे स्वरुपही त्यास समजले नाही. श्रीबाबांच्या सर्व हिंदु भक्तांना बाटविण्याचा एक विलक्षण विचार त्याच्या डोक्यात आला. त्याने त्यासाठी एक अजब शक्कल लढवली. नेहमीप्रमाणे श्रीबाबा लेंडी बागेत गेले असता ह्या फकिराने द्वारकामाईत ठेविलेल्या रांजणात सर्व पाणी उष्टावून ठेवले. हे पाणी प्याल्याने सर्व हिंदु बाटतील व मग श्रीसाईबाबांची त्यांच्या पकडीतून सुटका होईल, आणि श्रीबाबा केवळ मुसलमानांचेच "अवलिया" ठरतील ! जवळ राहूनही त्याने श्री बाबांना ओळखलेच नव्हते. अंतर्ज्ञानी सर्वज्ञ श्रीबाबांना त्याचा हा बेत दुष्ट कृत्य लगेच समजले. लेंडीवरुन परतताच श्रीबाबांनी एकदम रुद्रावतार धारण केला व त्या फकिरावर नजर रोखून शिव्यांचा भडीमार केला. त्याचे

कडूनच ते भरलेले रांजण फोडून टाकवले व इतर टमरेल वगैरे त्यांनी भिर कावून दिली. दोन तास असे गेल्यावर त्या फकिराला उद्देशून श्रीबाबा म्हणाले, हिंदुना बाटवून मुसलमान करणार होतास. माझ्या सहवासात राहून हेच शिकलास काय! त्याचे हे गर्वबिंग बाहेर पडून त्याला तेथून सर्वांनी हाकलवून दिला.

श्रीबाबा हे मुसलमान फकीरच आहेत आणि हिंदुच्या संगतीने ते बाटत आहेत, ह्या भावनेने एकदा एक धर्मवेडा रोहिला हातात जाडजूड सोटा घेऊन श्रीबाबांचाच कपाळमोक्ष करण्यासाठी धावत द्वारकामाईपर्यंत आला होता. त्याच्याकडे श्रीबाबांनी फक्त क्रुद्ध नजरेने रोखून बघीतले. त्यामुळे तो त्या नजरेनेच संपूर्ण हतबल झाला व धरणीवर लोळण घ्यायला लागला. शेवटी दोन माणसांचे साहय घेऊनच त्याला तेथून उठणे शक्य झाले. अशी ही श्रीबाबांची दृष्टी. दुसऱ्याच्या हृदयाचा ठाव घेणारी, समोरच्याच्या मनात शिरुन त्याच्या मनातील भाव ओळखणारी, कोण कशा करिता आला आहे हे त्यांना लगेचच पण आगाऊ समजत असे. (आपण श्रीसाई चरित्रात वाचतोच आहोत) अशा अनेकविध लीला प्रसंगाची ही द्वारकामाई साक्षीदार आहे. भाग्यवशात् हा वास्तुपुरुष बोलू लागला तर कितीतरी नव्या व अगम्य गोष्टी आपणांस समजतील. पण!! भक्तांनो आपण शिरडीत गेलात तर द्वारकामाईतील फोटोकडे एक नजरेने टक लावून बघा व तुम्हांस काय वाटते ते ठरवा.

## शिरडी येथील गुरुपौर्णिमा उत्सव

दरवर्षीप्रमाणे शिरडी येथे श्री गुरुपौर्णिमा उत्सव यंदा १ जुलै ते ३ जुलै १९८४ पर्यन्त साजरा होईल असे कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्ने साहेब हे कळवितात.

# साईकृपेचा अनुभव

-श्री. एस. जी. सावंत,
१-८६ गोखले नगर
पुणे ४११ ०१६.

० आमच्या घरी श्री साईबाबांची भक्ती १९५० पासून चालू आहे. किब-हूना श्री साईबाबाच आम्हां सर्वांचे दैवत बनले आहे. रोज सकाळी स्नान केल्यावर आम्ही सर्व साईबाबांची पूजा केल्याशिवाय तोंडात पाणी सुद्धा घेत नाही. दर गुरुवारी आमच्या घरी बाबांची संपूर्ण आरती होते. प्रत्येक साई भक्तांच्या पदरी अनेक श्री बाबांच्या लीलेचे असंख्य अनुभव असतात. भक्तांच्या अनेक अडी अडचणीत श्री साईबाबा भक्तांना आधार देवून आपले अस्तित्त्व दाखवत असतात. म्हणूनच शिर्डीत आलेला एक साधा फकीर आज साऱ्या विश्वात सुखकर्ता झालेला आहे. श्री साईबाबांचे भक्त केवळ भारतातच नव्हे तर अखिल विश्वात पसरलेले आहेत. स्वतःला असंख्य अनुभव आल्यामुळे तसेच इतरांचे अनुभव ऐकल्यामूळे साईबाबांचा भक्तगण वाढतच आहे. अंतःकरणपूर्वक कोठूनही मारलेली हाक साईबाबांच्या पर्यंत जाऊन पोहचते. परंतु आपल्याला फळ मिळेपर्यंत सबूरी ही धरावीच लागते व फळ मिळाल्या वरही बाबांना विसरुन चालत नाही.

माझा नंबर पांचचा मुलगा चि. भालचंद्र बी. कॉम. परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचे पुणे विद्यापीठाने जाहीर केले होते. परंतु त्याचा निकाल विद्या पीठाने राखून ठेवला होता कारण नियमाप्रमाणे त्याची इंग्रजी विषयाची ४० गुणांची परीक्षा कॉलेजने घेतली होती व त्या परिक्षेत तो पास झाला होता. त्याला २७ गुण मिळालें होते. परंतु कॉलेजच्या अधिकारी वर्गाने चुकून त्याचे इंग्रजी विषयाचे गुण विद्यापीठाकडे न पाठविल्यामुळे त्याचा निकाल विद्या-पीठाने राखून ठेवला होता. मला व माझ्या मुलाला मोठी काळजी वाटावयास लागली. घरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. काय करावे सूचेना. मी मनोमन बाबांची प्रार्थना केली व कॉलेजच्या प्रिन्सीपॉलकडे धाव घेतली. परंतु कॉलेजचे प्रिन्सीपॉल साहेब म्हणाले कीं तुमचा मुलगा कॉलेजमधून घेतलेल्या परिक्षेस बसला नसावा आणि म्हणून आम्ही विद्यापीठाकडे त्याचे

गुण पाठवू शकलो नाही. मी त्याना खात्रीने सांगितले की माझा मुलगा परीक्षेला बसला होता व त्यात तो पासही झाला होता व त्याची परिक्षेची फी पण मी भरली होती. तेव्हां ते म्हणाले की फी भरल्याची पावती दाखवा. परंतु योगायोग असा कीं बरोबर तीच पावती हरवली होती. तेव्हां पुन्हा एकवार बाबांची प्रार्थना करुन कॉलेजचे मुख्य अधिकाऱ्याकडे आम्ही गेलो. त्यांची व माझी थोडी फार ओळख होती. त्यांनी आम्हाला कॅशियरकडे पाठविले. पावती शोधण्यास सांगितले. त्याप्रमाणे कॅशियरकडे गेलो व पावती पाहण्यास सांगितले. त्याने त्या वर्षाची सर्व फाईल पाहिली. परंतु पावती सापडेना. आम्ही दोघेही निराश झालो. इतक्यात त्यांच्या ऑफिसमधील एक म्हातारा शिपाई आला आणि म्हणाला की साहेब काय शोधता आहांत.

तेव्हां मी म्हणालों कीं, माझ्या मुलाने परिक्षेची फी भरल्याची पावती. तेव्हां तो म्हातारा शिपाई म्हणाला कीं, साहेब ही चालू वर्षाची फाईल आहे. बॅक लागची फाईल दुसरी आहे. लगेच त्याने ती फाईल कपाटातून काढून दिली व आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या फाईलीत आम्हाला हवी असलेली पैसे भरल्याची पावती लगेच मिळाली. तेव्हां त्यावेळी आम्हांला जो आनंद झाला त्याचे वर्णन आम्ही शद्बानी करु शकत नाही. म्हणजे त्या म्हाताऱ्याच्या रुपाने प्रत्यक्ष आमच्या हाकेला बाबाच धावून आले.

लगेच त्या अधिकाऱ्याने संबंधित कारकूनांकडे आम्हाला पाठवून जुना रेकॉर्ड काढावयास सांगितले व त्यात माझ्या मुलासह १९ विद्यार्थी पास झाल्याचे मार्कशीट सापडले व ते सर्व विद्यार्थी माझ्या मुलाबरोबर उत्तीर्ण झाल्याचे विद्यापीठाने जाहीर केले. तेव्हां असे हे आम्हां सर्वांचे श्री साई बाबा संकटाचे वेळी धावून येणारे.

अशा प्रकारे माझ्या हाकेला धावून येणाऱ्या कृपाळू साई माऊलीला आम्हा सर्वांचे शतशः कोटी कोटी प्रणाम.

असा आहे साई चमत्कार.

★

# मला श्रद्धा लाभली

—सौ. अश्विनी अशोक चिपकर
न्यू बी. डी. डी. चाळ नं. १०–४८
अपना बाजार जवळ नायगाव
मुंबई ४०० ०१४.

० यापूर्वी मला साईमाऊलीच्या कृपेने एका पुत्ररत्नाचा लाभ झाला आहे. त्याला बरे नसताना साईमाऊलीच्या लॉकेटच्या स्पर्शाने तो बरा झाला आहे. व याप्रमाणेच साई आपला वरदहस्त आमच्या डोक्यावर ठेवतील याची मला खात्री आहे.

दुसऱ्या वेळेस मला डोहाळे लागलेले बघून व दिवस भरता भरता शरीराची ठेवण बघून माझी अनुभवी जाऊ व इतर वयस्क बायका मला सागतच रहायच्या की तुला याही वेळेला मुलगा होणार. पण मी मात्र त्यांना मनातच हसत होते. कारण मला खात्री नव्हे १०० टक्के खात्रीच होती की मला मुलगीच होणार. कारण माहीत आहे? नाही ना! मग ऐका! मी रोज साईबाबांजवळ प्रार्थना करताना एकच मागणे मागत होते की "साई मला एक मुलगा आहे. आता मात्र मुलगी हवी व सकाळ संध्याकाळ उदी पाण्यात टाकून पीत होते. व साईमाऊलीने या लेकीचा हट्ट पुरवला. मला मुलगीच झाली. आता तुम्हाला कल्पना आलीच असणार की मला 'श्रद्धा' कशी लाभली.

तसेच "श्रद्धा" झाल्यानंतर माझ्या हलगर्जीपणामुळे माझे कान निकामी झाले होते. एका कानातून पाणी यायचे तर दुसऱ्या कानात पू यायचा. व खाताना, बोलताना आवाज आतल्याआत घुमत रहायचा. कानाचे २–३ डॉक्टर झाले. पण गुण आला नाही. एका डॉक्टरने तर अक्षरशः शेवटच्या निर्णय दिला की "मी चिटी लिहून देतो ती घेऊन सायन हॉस्पिटलमध्ये जा व तिथल्या स्पेशल डॉक्टरांना भेटा. कानाचे पडदे साफ बाद झाले आहेत." मी व माझे मिस्टर निराश होऊन घरी आलो.

माझी आई सारखी माझ्या मागे लागली होती कीं, "मध तरी कानात घालून बघ." पण मी मनावर घेतले नव्हते. पण शेवटचा उपाय म्हणून मी साईंचे नाव घेतले व मधात थोडी उदी टाकली. तो मध मी दिवसातून ३ वेळा कानात टाकू लागले. मध घातल्यावर असा ठणका लागायचा कीं, मी सांगूच शकत नाही. पण तेव्हा मी "साईलीला" वरील बाबांच्या फोटोकडे बघत राहून साईनामाचा जप करत होते. ठणक्यामुळे डोळ्यातून पाणी यायचे. असे ४–५ दिवस हा उपाय केल्यानंतर खरोखरच गुण आला, व आता माझे कान ठणठणीत बरे झाले आहेत. ही सर्व साई धन्वंतरीची कृपा नव्हे काय ?

तसेच छोटयामोठया कारणातही साईमाऊली कायम मदत करते. मनात वाईटही वाटते की आपण क्षूल्लक गोष्टींसाठीही साईंना त्रास देतो. पण काही गडबड झाली की लगेच साईमाऊलीला हाक मारणे हा प्रकार आपोआप घडतो. कसे ते पहा.

आम्ही पोलीस क्वार्टर्समध्ये रहातो. निदान आमच्या माळ्यावरील सर्व खोल्यांमधून मुंग्यांची लाईन लागलेली दिसते. आमच्याही खोलीत भरपूर लाईनी आहेत. परवाचीच गोष्ट. मी सकाळीच उठले. श्रद्धा झोपलेली होती. ती फार लोळते. जमीनीवर पडणार म्हणून बाजूला बिछाना लावते. बिछाना काढायला सुरवात करताच प्रत्येक गोधडीमध्ये मुंग्यांची गर्दी. ते बघूनच आपण साईबाबांपुढे गाऱ्हाणे घातले. मनात म्हटले बाबा उद्यापासून ह्या मुंग्या श्रद्धाच्या बिछान्यात नको हं ! आम्हाला चावल्या तरी चालेल. पण तिला नको." खरोखरच दुसऱ्या दिवशी बिछान्यात मुंग्या नव्हत्याच.

अशा प्रकारे बाब लहान असो की मोठी. साई धांवून येतातच. "साई तुझे लाख लाख उपकार !"

# "ताजुद्दिनबाबा माझे दैवत"

(सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व नंतर भारताचे उपराष्ट्रपती म्हणून ऑगस्ट १९८४ मध्ये निवृत्त झालेले श्री. महंमद हिदायतुल्ला यांचे इंग्रजी भाषेत लिहिलेले आत्मवृत्त १९८० साली अरनॉल्ड हैनेमान, लंडन या प्रकाशकांनी प्रसिद्ध केले. त्यात पृष्ठ ३४ वर ताजुद्दिनबाबांनी त्यांना लहानपणी दिलेल्या आशिर्वादाची एक सुरस कथा आहे तिचा तपशील असा)

माझा जन्म ता. १७ डिसेंबर १९०५ रोजी झाला. १९१७ साली माझे वडील खानबहादुर हाफिझ महम्मद विलायतुल्ला मध्यप्रांतातील छिंदवाडा जिल्ह्याचे कलेक्टर असताना घडलेली ती घटना. एक दिवशी दुपारी मी आपल्या संवगड्यांसह टिकऱ्यांचा खेळ खेळत असतानां बऱ्याच लोकांचा एक मेळा झेन्डे-पताका मिरवत व वाजत गाजत आमच्या घरावरून जात होता. छिंदवाडा जवळच्या सिलेवणी वनातील मोरनाल्याला राहणारा मुर्शद मिरवणूकीच्या अग्रभागी होता. मिरवणूक आमच्या घरावरून पुढे जाण्याऐवजी आमच्या आवारात आली व मी आईला सांगण्यासाठी आत पळालो. घराच्या ओटयावर माझे वडील बसले होते. ओटयाच्या पायऱ्या न चढता मुर्शदाने खालूनच विलायतुल्लांच्या कनिष्ठ चिरंजीवास भेटण्याची इच्छा दर्शविली. माझ्या वडिलांनी मला बाहेर आणण्यास सांगितले. माझ्या दोन बंधूनी मला बकोटीला धरून बाहेर आणले व मुर्शदासमोर उभे केले. मुर्शदाने आपल्या खिश्यात हात घालून बिडीचे थोटुक आत असलेली एक पुडी बाहेर काढली व मला म्हणाला शकरदरा, नागपूरच्या ताजुद्दिनबाबांनी मोरनाल्याला भेट दिली. तेव्हा ही मला पुडी देऊन विलायतुल्लांच्या कनिष्ठ चिरंजीवास 'ही तुझी लेखणी होईल व या लेखणीच्या सहाय्याने तू श्रेष्ठ पदास चढशील' (This will be the pen and with this pen thou shalt ride an elephant') या त्यांच्या आशिर्वादासह देण्यास सांगितली आहे. असे म्हणून माझ्या हातात ती पुडी ठेवली व एक क्षण अधिक न थांबता मुर्शदाने आमच्याकडे पाठ फिरवून आपल्या अनुयायांसह मोरनाल्याकडे कूच केले. माझ्या आईने ताजुद्दिनबाबांचा तो प्रसाद ब्रॉकेडच्या बटव्यात ठेवला व तो बटवा सदैव माझ्या बरोबर असतो ताजुद्दिनबाबा हे माझे लहानपणापासूनचे दैवत आहे. त्यांची सुंदर कबर ताजाबाद नागपूर येथे आहे.

# श्रीसाईनाथांचा शरणार्थी

********************

लेखक : ब्रम्हीभूत स्वामी साईशरणानंद

अनुवादक : श्री. वि. बा. खेर

० मी बैलगाडीने कोपरगाव स्टेशनवर जायला निघालो. गाडीवाला एक मुलगा होता. नदीपर्यंत आल्यावर गाडीवाला म्हणाला, "येथे पेरूंची बाग आहे. फार चांगले पेरू मिळतात. थोडे घरी घेऊन जा. मी उतरून तुमच्यासाठी घेऊन येतो." मी म्हणालो, "आता काय उपयोग? परंतु तुझ्याकडे दिलेले पेरू साईबाबांकडे पोचवणार असलास तर घेऊन ये." हो म्हणून त्याने गाडी उभी केली व पेरू आणण्यास गेला. मी लघुशंका करण्यास खाली उतरलो व ते कार्य संपवून गाडीवाल्याची वाट पहात इकडे तिकडे फिरत असता एक विचित्र घटना घडली. माझ्या पायातील नवीन बुटांचा होणारा चुं चुं आवाज ऐकून गाडीचे बैल बुजले व उलटे फिरून गाडीतील सामानासकट शिरडीकडे त्यांनी धाव घेतली. मी व दुसऱ्या एकाने बैलांचा पाठलाग करून गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला पण तो व्यर्थ ठरला. म्हणून जेथे प्रथम गाडी उभी केली होती त्या जागेवर येऊन मी थांबलो व गाडीवाल्याचीं वाट पाहिली. परंतु गाडीवाला बराच वेळ न आल्याने मी कोपरगावच्या दिशेने चालू लागलो काही अंतर कापल्यावर विरूद्ध दिशेने गाडीवाला दोन पोलिस शिपायांसह टांग्यातून यताना दिसला. मला पाहून तो टांग्यातून उतरला, व त्याची बैलगाडी विकून आलेले पैसे घेऊन पळून चालल्याचा आरोप त्याने माझ्यावर केला, व मला पोलिसांच्या स्वाधीन करू लागला! पोलिस मला म्हणाले, कोपरगावच्या पोलिस स्टेशनवर चला. पोलिसांच्या आपसातील संभाषणावरून गुन्हा केल्याची कबूली देण्यास भाग पाडण्यासाठीं मला काही त्रास देण्याचा त्यांचा विचार असल्याचे मी ताडले तेव्हा त्यांना ताकीद देऊन मी म्हणालो, "खबरदार, मला हात लावला तर! लक्षात ठेवा, मी कायद्याचा पदवीधर आहे, आणि तुम्हाला चांगली अद्दल घडवीन" त्याचा योग्य परिणाम होउन पोलिस चपापले, व मला पोलिस स्टेशनवर घेऊन गेले. तेथे त्यांचा वरिष्ठ अंमलदार त्यांना शाबासकी देऊन म्हणाला, अरे वाह तुम्ही तर गुन्हयाचा तलास करून गुन्हेगाराला मुद्दा धरून आणले,.

पोलिस शिपायांनी अंमलदारास मी गाडी विकल्याची हकीकत सांगताच त्याने माझे पाकीट खिसे तपासले, परंतु त्यातून गाडीच्या किंवा बैलांच्या किंमती इतकी रक्कम सुद्धा मिळाली नाही. शिवाय माझे सामान पण त्या गाडीत राहिले होते. तेव्हा तक्रार निकालात काढून तो शिपायांना म्हणाला, "ह्यांना परत घेऊन जा आणि रस्त्यात गाडीचा शोध लागला नाही तर काय करायचे ते पाहू" नंतर मला घेऊन पोलिस टांग्याने निघाले व वाटेत उपहारगृहात नास्ता करण्यासाठी थांबले. या विचित्र घटनेत सापडताच मी साईबाबांचे स्मरण करण्यास सुरूवात केली, असं समजून की बाबा खरोखरच देव असले तर या प्रकरणाचा शेवट समाधानकारकच होईल. पोलिस उपहारगृहातून बाहेर पडले तेव्हा मी बाहेरच्या ओटयावर बसून नामस्मरणात दंग होतो. बराच वेळ गेल्याने रात्र झाली होती आणि पोलिसांनी माझ्या हातात चाकू देऊन मला म्हणाले, "पात उघडून हातात धरा रात्री लुटारूंपासून येथे भय असतं." असे चारी बाजूंकडे नजर ठेवून शिरडीकडे परत येता येता साऊळ विहीरी पर्यंत पोचलो तेथे सडकेवर गावचा चौकीदार उभा होता. त्याच्याकडे चौकशी करता तो म्हणाला, "येथे संध्याकाळच्या प्रहरी एक बैलगाडी सामानासह, परंतु गाडीवाला किंवा उतारू शिवाय, आली. आम्हाला तर असं वाटलं की सामान असलेल्या उतारूचा खून झाला असावा. वाट पाहून आम्ही कंटाळलो व स्वस्थ बसलो."

पोलिसांनी रात्रीच्या रात्री निकाल केला नाही. ते म्हणाले, "आम्हाला या केसचा पंचनामा करावा लागेल. म्हणून त्यासाठी उद्या सकाळी या." त्यामुळे मी आणि गाडीवाला असे दोघे शिरडीला परतलो. ती सारी रात्र मी अंगावर कांबळे ओढून बाळाभाऊच्या खानावळीच्या बाकड्यावर पडून काढली व पहाट होताच गाडीवाल्यासह साऊळ विहीरीवर गेलो. तेथे पंचनामा झाल्यावर माझे पैशाचे पाकीट व सामान परत करण्याची पोलिसांना विनंती केली. परंतु ते म्हणाले की कोपरगांव स्टेशनवर मी स्वतः जाऊन सामान मिळाल्याचे कळविल्याशिवाय ते परत मिळणार नाही. म्हणून सांगितल्याप्रमाणे करून सामानाचा कबजा घेतला व गाडी शिरडीला रिकामी जाणार होती तीत बसून शिरडीला आलो. तेथे माझ्यावर ओढवलेल्या प्रसंगाची हकीकत ऐकूण खापर्डेंना व शिगणेंना आश्चर्य वाटले की, बाबांची अनुज्ञा घेतली असली तर असे होईलच कसे ! नंतर खापर्डे मौजेने म्हणाले, "तुम्ही मला सांगितल्या [शिवाय निघाला म्हणून असे घडले." शिगणेने असा मुद्दा काढला की पोलिस

कुठल्या कलमाच्या आधारे अशी धरपकड करू शकतात वगैरे. नंतर मी विचार केला की अशा रीतीने बाबांनी मला ज्या अर्थी माघारी बोलावले तेव्हा दोन दिवस शिरडीत राहून नंतर निघावे.

या दरम्यान एकदा सकाळी सुमारे साडे दहा वाजता काही भक्तांनी बाबांच्या हातात फोटो देऊन तो घरी घेऊन जाण्यासाठी घेतला, तेव्हा मी सुद्धा माझ्या खिश्यात बाबांचा छोटा फोटो व लॉकेट घेऊन ठेवले होते ते बाबांच्या हातात देऊन प्रसाद म्हणून घेतले. त्यानंतर शिरडीहून निघण्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळी आमच्या ओळखीचे मिठाचे व्यापारी दयाळशेठ यांचा मुलगा गिरधरलाल तन्ना डहाणुहून आला होता त्याने माधवराव व काकासाहेब दीक्षितांना माझ्या वडिलांना माझ्याविषयी वाटत असलेली चिंता व्यक्त करून म्हणाला, "येथे प्लेग चालू आहे म्हणून ते फार काळजीत आहेत व शिवाय मुलाकडून खुशालीचे पत्र सुद्धा नाही. म्हणून त्याला समजावून घरी पाठवून द्या."

दुसऱ्या दिवशी सकाळी माधवरावांनी माझी चौकशी केली तेव्हा मी निघण्याच्या तयारीत होतो. ते पाहून त्यांनी मला वरच्या मजल्यावर काकासाहेबांकडे नेऊन माझा परिचय करून दिला. काकासाहेबांकडे चहापान करून मी बैलगाडीत बसलो व मला पोचविण्यासाठी माधवराव सडकेवर काही अंतरापर्यन्त आले. या प्रथम भेटीत बाबांनी मला आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखविली. विशेषकरून ते स्वतः खरोखर देव आहेत याची पुरेपूर खात्री करून दिली. त्यांच्या नामस्मरणाने माझ्यावर आलेली आपत्ति टळली. बैलगाडी माझ्या सामानासकट पाच सहा तासांनी साऊळ विहीरीवर ठाकठीक पोचून गावच्या चौकीदाराच्या हाती आली व आम्हाला सापडली. फोटो प्रासादिक करण्याचे राहून गेल्याने बाबांनी मला माघारी खेचून आणले व अपुरे राहिलेले कार्य उरकून नंतर जाऊ दिले. कोणी काही धार्मिक कार्य करण्याचे स्वतःशी योजले असल्यास ते पूर्ण झाल्याशिवाय त्याला जाऊ न देण्याची बाबांची काळजी त्यावरून स्पष्ट होते. अजूनसुद्धा बाबा अशीच काळजी राखतात याची खात्री १ ऑगस्ट १९५७ रोजी चंदुलाल पाठक यांना शिरडीला आलेल्या अनुभवावरून पटते. त्यांनी योजलेली दक्षिणा समाधी मंदिरात ठेवण्याचे राहून गेले तेव्हा त्यांची एक बस चुकवून त्याबाबत त्यांना आठवण करून दिली व अपुरे राहिलेले कार्य पुरे करून घेतले. आणखी महत्वाची गोष्ट

म्हणजे माझ्या दहा दिवसांच्या शिरडीच्या मुक्कामात बाबांनी दिलेली विष्णु-बुवा ब्रह्मचारांच्या गीतेवरील टीकेबद्दल सूचना.

एवढी सगळी प्रचीति येऊनही मला अंतरंगी बाबांच्याविषयी प्रेम उपजले नाही. परंतु ते ईश्वर असल्याची खात्री झाल्याने फावल्या वेळात त्यांचे नाम-स्मरण चालू ठेवले होते. माझा स्वभाव ओळखून शिरडीला जाण्यापूर्वी वडि-लांनी मला आवर्जून सांगितले, "बाबा जो काही प्रसाद देतील तो फेकून देऊ नकोस. मांसाचा तुकडा जरी प्रसाद म्हणून मिळाला तरी संभाळून ठेव. "ही सावधगिरीची सूचना सकारण होती. हे कवडेंनी बाबांविषयी लिहिलेल्या पुस्त-काच्या आधारे आता स्पष्ट होते. वरील पुस्तकाच्या पृष्ठ ७० ते ७२ वर एका दरिद्र कर्मठ ब्राह्मणाची कथा आहे. तो बाबांच्या दर्शनाला आला तेव्हा त्याच्या उपरण्यात बाबांनी मांसाचे चार तुकडे बांधून दिले व म्हणाले," तुझे चार पुत्र खातील एवढे हे आहे." ब्राह्मण कर्मठ असल्याने बाबांच्या प्रसा-दाची किंमत तो समजला नाही. त्याने प्रसाद घेतला खरा पण त्याचा त्याला तिटकारा आला व शिवेंच्या ओढयावर पोचल्यावर त्याने आपले उपरणे पाण्यात खळबळले तेव्हा त्याच्या हाताला काही कठीण लागले. एखादे हाड राहिले असेल असे वाटून त्याने उपरणे जोराने झटकले तेव्हा अर्धा-पाऊण तोळयाच्या वजनाची एक सोन्याची सळी बाहेर पडली. ते पाहुन तो विस्मित झाला व दुसऱ्या तुकंडयांचा शोध घेण्याचा प्रयत्न त्याने केला परंतु तो असफल ठरला या चमत्काराचे वर्णन साईबाबांच्या दुसऱ्या कुठल्याही पुस्तकात नाही. परंतु १९५६ साली कवडेनी नव्वद वर्षे वयाच्या शिरडी निवासी बाबाजी बापूजी जगताप यांच्याकडून ही गोष्ट ऐकली. बाबांकडून मांसाचा प्रसाद जरी मिळाला तरी तो घ्यावा हया माझ्या वडिलांच्या सावधगिरीच्या सूचनेवरून सुद्धा असे वाटते की त्यांनीसुद्धा वरील कथा ऐकली असावी.

– (क्रमशः)

# श्रींची कृती हीच धर्माची शिकवण

—श्री. किशनराव कुळकर्णी
१६१, श्रीसाई कृपा, कैलास नगर
अदीलाबाद आं. प्र.

० श्रीसाईबाबांच्या निस्सीम भक्तांना त्यांचे चरित्र व त्यांच्या जीवनावर आधारीत साहित्य वाचण्याची आवड ही निश्चितच असते. ह्या साहित्यात बाबा आपल्या भक्तांना कृतीद्वारे सुलभ व सोप्या प्रकारे धर्माची शिकवण देत असत याची कितीतरी उदाहरणे आहेत.

बाबा आपल्या भक्तांकडे दक्षिणा मागत असत व त्यांचे कडून इच्छीत रक्कम दान म्हणून ग्रहण करीत असत. बाबांच्या या कृती मागे गूढार्थ होता व आपल्या भक्ताकडून धर्माचे पालन करवून घेण्याचाच उद्देश होता हे सिद्ध होते. बाबांना काही धनसंचय करावयाचा नव्हता अथवा त्यांना पैशाची हाव पण नव्हती बाबा सढळ हाताने दान करीत असत व परोपकारासाठी खर्च करीत असत याचीही उदाहरणे आहेत. बाबा दक्षणा मागण्याच्या कृतीद्वारे आपल्या भक्तांना कलियुगातील धर्माचे पालन करण्याची शिकवण देत असत.

।। तपःपरं कृत युगे त्रेताभां ज्ञान मुच्यते ।।
।। द्वापारे यज्ञ मेवाहूर्दानमेकं कलौ युगे ।।

सत्ययुगामधे तपश्चर्या हा धर्म होता आणि त्रैता युगामधे ज्ञानप्राप्ती हाच धर्म होता. द्वापार युगामधे यज्ञ तर कली युगामधे "दान" हा धर्म आहे. म्हणूनच श्रीसाईबाबा आपल्या भक्तांकडे दक्षणा मागून त्यांना दान करण्यास प्रवृत करीत व काटेकोरपणे धर्माचे पालन करून घेत असत. कृतीद्वारा शिकवण देण्याची श्रीसाई माऊलीची तळमळ ही अविस्मरणीय आहे.

# दिव्यत्त्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती

– कमला गोरे
म्युनि. जी. बिल्डिंग
पहिला मजला. खो. नं. १०
सायन मंडारवाडा, मुंबई नं. ४०००२२

सज्जनांना दुष्टांपासून सोडविण्यासाठी –

देवांना अनेक रूपे धारण करावी लागली. उदा. कंसापासून सोडविण्याचे काम देवाचा आठवा अवतार म्हणजे कृष्ण याने केले. तसेच रामाने रावणाचा वध केला.

त्याचप्रमाणे कलीयुगात मानवाला सन्मार्गाला लावण्यासाठी आणि ईश्वर-भक्तीचे सार समजून देण्यासाठी ऋषीमुनी, संत यांचा अवतार उदयास आला उदा, संत ज्ञानेश्वर, तुकाराम या संतानी ईश्वर सेवा करा दिनदुबळयांची सेवा करा असे उपदेश केले. तुकारामाने म्हटलेच आहे की,

> **"जो का रंजला गांजला त्यासी म्हणे जो आपुला**
> **तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा."**

संत गाडगेबावांनीसुद्धा जनसेवाच केली. तसेच संत साईनाथ महाराज यांनी सुद्धा दुःखी कष्टी माणसांना आधार दिला. दगडाचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही. तद्वत्‌च सर्व थोर ऋषीमुनी साधु संत यांच्याबाबतीत घडून आले. संत तुकाराम महाराजांची अंभगगाथा नदीत फेकली पण महाराजांच्या ईश्वर-भक्तीनेच ती कोरडी पाण्याबाहेर आली. संत ज्ञानेश्वरांनी योगसामर्थ्याने भिंत चालवली. रेड्यामुखी वेद वदवले. तेव्हाच ते संत ज्ञानेश्वर महाराज झाले.

त्याचप्रमाणे श्री सद्‌गुरु साईबाबा जेव्हा शिरडीला आले तेव्हा त्यांना सद्धा लोकांचा त्रास सहन करावा लागला. पण जेव्हा त्यांचे अनमोल सामर्थ्य आणि तेजस्वीपणा दिसू लागला तेव्हा जाणकार व्यक्तिने हिऱ्याचे तेज ओळखले आणि ते सर्वांचे बाबा, माऊली झाले. खरोखरच आईवडिल ज्याप्रमाणे आपल्या

मुलावर माया करतात. चूक झाल्यास क्षमा करतात. हट्ट पुरा करतात. त्याप्रमाणे सद्गुरु साईमाऊलीकडे प्रार्थना केल्यानंतर कोणीच विन्मुख होत नाही. या आईचे प्रेम सदैव आपल्या मुलावर आहे-

जसे घार हिंडते आकाशी । लक्ष तिचे पिल्लापाशी ।
माता गुंतली कामाशी । चित्त तिचे बाळापाशी ॥
वानरी हिंडे झाडावरी । पिल्ले बांधुनी उदरी ।
तैसे आम्हा विठ्ठलमाये । जनी वेळोवेळी पाहे ॥

त्याप्रमाणे सद्गुरु साईमाऊलीचे साईभक्तावर सदैव लक्ष असते. साई माऊली आम्हाला विसरणार नाही. आणि आम्ही साईभक्त सद्गुरु माऊलीस जीवात जीव असेपर्यन्त विसरणार नाही. सदैव मुखाने एकच नामस्मरण चालेल

"श्री सद्गुरु साईनाथ महाराज की जय"

## साईभक्त हजारे यांचे निधन

मालेगावचे प्रख्यात साईभक्त व तेथील माजी शिक्षणाधिकारी श्री. दत्तात्रय नानाभाई हजारे बी. ए. यांचे वसई मुक्कामी दिर्घकालीन आजार व वृद्धापकामुळे वयाच्या ८९ व्या वर्षी देहावसान झाले. श्री. हजारे यांनी आपल्या कारकिर्दीत मालेगाव, सौंदाणे, तहाराबाद, उंबराणे इ. ठिकाणी विविध शिक्षण संस्था स्थापून साक्षरता प्रसाराचे वर्ग उघडून विद्यादानासारखे परमपवित्र कार्य केले. इंग्रजी व संस्कृत हे त्यांच्या अतिआवडीचे विषय होते. त्यांच्या पश्चात् पत्नी, सहा सुविद्य कन्यका व नातवंडे व असंख्य साईभक्त परिवार आहे. साईलीलातून एकाकाळी काव्यलेखन करणाऱ्या साईभक्त सुशिलाबाई हजारे या त्यांच्याच पत्नी होत.

श्रीसाई मृतात्म्यांस चिरशांती व सद्गती देवोत. आम्हीही हजारे कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.

# समभावनेचे मेरूमणि–श्रीसाईबाबा

–श्री. पां. वा. भुतकर
२३।१६७७ अभ्युदय नगर,
काळाचौकी मुंबई ३३

० आम्ही साईबंधु आहोत बंधु हे जगातले सर्वात जवळचे नाते. एकाच आईच्या उदरातून आलेले. यापेक्षा जास्त जवळचे नाते असूच शकत नाही.

सर्व लेखकांचे तसेच वाचकांचे इतके निकटचे नाते सहजासहजी जमलेले नसते पण त्या मागे श्रीसाईची अदभूत रम्य अशी प्रेरणा असते. आयुष्यभर साईबाबांनी याचा पाठपुरावा केला आहे. साईबाबांनी आपल्या सर्व भक्त मंडळीना आयुष्यभर समान लेखले त्यांनी कोणत्याही भक्तास मी दुसऱ्या भक्ताहून बाबांचा जवळचा भक्त आहे असे वाटू दिले नाही. ज्यावेळी काही भक्तांना असा अभिमान झाला होता. त्यावेळेस मोठ्या युक्तीने बाबांनी अशा भक्तांचा भ्रम दूर केला.

साईबाबांच्या हयातीत हिंदू, मुसलमान, पारशी, खिस्ती अशा सर्व जाती जमातीचे लोक त्यांचे भक्त होते. धट्टेकट्टे तसेच महारोगी किंवा क्षय प्लेग याने पिडलेली अशीही भक्तमंडळी होतीं पण सर्वांना त्यांनी समान लेखले त्यांच्या भक्तीचा स्विकार केला. व रोगांचा परिहार केला.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पुढील उक्तीप्रमाणे त्यांची रहाणी होती.

**की गायीची तृषा हरू ।**
**व्याघ्रा विष होऊन मारू ।**
**हे नेणेची गा करू ।**
**तोय जैसे ॥**

मशिदीत बाबा स्वहस्ते जेवण करीत व सर्व जाती जमातीचे लोक पंक्ति प्रपंच न करता सर्व लोकही मोठ्या हौसेने एकत्र बसून सहभोजन करीत ही कशाची किमया बरे ?

बाबांचा समभाव येथेच संपत नाही. तो यापुढेही जातो. कुत्री, मांजरे पशु, पक्षी यांच्या पर्यन्त पोहचलेला असतो. कुत्र्याला भाकर दिल्यास बाबांचे पोट भरते. शेळ्यांना गुळ व चणे घालून बाबा स्वतःचा आत्मा शांत करतात. अशी शेकडो उदाहरणे साईसत्चरित्रात वाचावयास मिळतात.

साईबाबा हे भक्तीचा प्रचंड सागरच असल्यामुळे त्यांचे जे भक्त नदीच्या ओहळाच्या, ओढ्याच्या स्वरूपात त्यांना मिळतात ते त्यांच्याशी एकरूप होतात. सर्व एकसारखे पाणी होऊन जाते. त्यातून नदी, ओहोळ किंवा ओढा वेगळा करून दाखविता येत नाही. तद्वतच सर्व साईबंधु हे सागरासारखे आहेत व म्हणूनच सर्व साईबांधवामध्ये प्रेमाचे एक अतूट नाते निर्माण झाले आहे. मी मोठा हा लहान वगैरे भेदभाव त्यांच्या मनाला स्पर्शून देखील जात नाहीत. आम्ही सर्व लोक साईभगवानाचे सेवक आहोत हीच भावना प्रबळ होते. साई-बाबांच्या भक्तामध्ये जातीभेद नाहीत. प्रांतभेद नाहीत, धर्मभेद तर मुळीच नाहीत, आमच्यात तर तम भाव नसून सर्व समभाव आहे.

अशा तऱ्हेने सर्व समभाव ज्यानी प्रस्थापित केला अशा सद्गुरु साईबाबांना आपण दोःही हात जोडून वंदन करण्यापेक्षा जास्त काय करू शकतो.?

**गुरुर्ब्रम्हा गुरुर्विणु: गुरूर्देवो महेश्वरः ।**
**गुरूः साक्षात् परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः ॥**


## श्रीसाईलीला

### पुढील अंक खास गुरुपौर्णिमा विशेषांक

१ जुलै १९८५ रोजी थाटात प्रकाशित होईल. गुरुविषयक विविध विषयां-वरच्या माहितीपूर्ण लेखांनी खच्चून भरलेला हा अंक आपल्या संग्रही ठेवाच. मुखपृष्ठावर बाबांचे मनोहारी चित्र.

पृष्ठे ६४ किंमत १ रुपया फक्त

# जया मनी जैसा भाव।
# तया तैसा अनुभव ॥


—सौ. अंजली गजानन वरणकर,
द्वारा गजानन गणपत वरणकर
१/१०, सुर्यवंशी भुवन, नं. २,
ई. एफ्. पाटनवाला मार्ग,
मुंबई क्रमांक ४०० ०२७.


प्रथम आम्हाला साईलीला' अंक माझ्या एक साईभक्त मैत्रिण सौ. कविस्कर-बाई यांच्याकडून वाचण्यास मिळाला. त्या अंकातील सदगरु साईमाऊलींच्या अंकात लीला वाचून आणि भक्तांचे अनुभव वाचून आम्ही अक्षरशःभारावून गेलो. त्यानंतर लगेचच आम्ही साईलीला अंक सुरु केला.

१९७५ साली माझे लग्न झाले, आणि लगेचच आम्ही शिर्डीला बाबांच्या दर्शनाला गेलो. माझे पती माझे लग्न झाल्यापासून मी साईभक्ती करताना पहातं.

नंतर १९७८ साली मला माझा मोठा मुलगा चि. मिलिंद झाला. तो आठ महिन्याचा असतानाच मी माझ पती आणि आई त्याला घेऊन बाबांच्या दर्शनाला गेलो. जाताना गडबडीत माझे पैशांचे पाकीट घरीच राहून गेले. तिकडे एस. टी. स्टॅंडवर आमच्या लक्षात आले. मला तर ते येतानाच गडबडीत पडले असे वाटले. तरीही आम्ही परत घरी आलो नाही. आमच्या तिघांकडे मिळून ४०–५० रुपये होते मी म्हणाले कांही हरकत नाही· आपण शिर्डीलाच जात आहोत बाबा सर्व व्यवस्थित पार पाडतील आणि आश्चर्य म्हणजे तिसऱ्या दिवशी आम्ही पुन्हा मुंबईत आलो तोपर्यंत आम्हाला कांहीही कमी पडले नाही. माझे पती एस्. टी. महामंडळात नोकरी करत असल्यामुळे फ्रि पास आमच्या कडे होता.

परंतु मुंबईत आल्यावर चि. मिलिंदला उलटचा जुलाब सुरू झाले. कांहीच औषध लागू पडेना. शेवटी दुसऱ्या डॉक्टरांकडे घेऊन जाण्यासाठी

बसस्टॉपवर उभी होते. संध्याकाळी ७ चा सुमार होता. माझ्या पाठीमागे एक पारशी बाई आल्या आणि मला त्यांनी "बच्चेको क्या होता है!" असे विचारले आणि त्याच्या पाठीवरून हात फिरवू लागल्या. त्यांनी मला हातावर तेल घेऊन त्याच्या पाठीमागून हात फिरवून माकडहाडाजवळ चिमटा कसा घ्यायचा हे प्रत्यक्ष दाखवले. आणि उलटी थांबण्यासाठी लिंबूपाणी दे असे सांगितले. घबरानेकी कोई बात नही, "बच्चा अच्छा हो जायेगा" एवढं म्हणाल्या. तेवढ्यात बस आली आणि मी बसमध्ये चढले. नंतर मी त्या बाईंना वळून पहाण्याचा प्रयत्न केला पण त्या कुठेच दिसल्या नाहीत. डॉकटरांकडे काळाचौकीला गेले. त्यांनी कॅलटीन सिरप द्या आणि नाही थांबले तर चिठ्ठी देतो. कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये घेऊन जा. थांबू नका असे सांगितले. मी तर अगदी भांवावून गेले. घरी आले आणि तेवढ्यात माझे पति कामावरून आले. त्यांना बघितल्याबरोबर मला त्या पारशी बाईंची आठवण झाली आणि तो प्रसंग सांगतांना मी अक्षरशः रडू लागले. लगेच त्या बाईंनी सांगितल्याप्रमाणे केले आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल की पुन्हां मिलिंदला उलटी झाली नाही की जुलाब झाला नाही. ही कृपा साईमाऊलीशिवाय कोण बरे करणार ?

दुसरा एक न विसरण्यासारखा प्रसंग म्हणजे माझा धाकटा मुलगा ज्याचे नांव पूर्वी शैलेश ठेवले होते परंतु तो एका मोठ्या आजारातून आता प. पू. बाबांच्या कृपा प्रसादाने बरा होत आहे. तेव्हां त्याला आम्ही बाबांचा प्रसाद म्हणून साईप्रसाद अशीच हाक मारतो. तो १ जून १९८३ ला साधारण दीड वर्षाचा असतांना तापात बेशुद्ध झाला. तेव्हां त्याला कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. तीन जूनला त्याला दुपारी मोठी आकडी आली. आकडीवर देतात ते इंजेक्शन हॉस्पिटलमध्ये नव्हते. माझ्याजवळ आमच्या घरचे पण कोणी नव्हते. इंजेक्शन तर पाहिजे होते. शेजारच्या पेशंटजवळील एक सद गृहस्थ लगेच इंजेक्शन आणायला गेले. परंतु त्यांना ते बऱ्याच ठिकाणी फिरले पण मिळाले नाही. शेवटी एके ठिकाणी ते मिळाले व ते जवळ जवळ एक तासाने परत आले. बाळाला १० मिनिटे सतत आकडी येत होती आणि मी बाबांचा धावा करीत होते, आणि जवळील बाबांची साक्षात् संजीवनी असलेली उदी त्याच्या अंगाला चोळत होते. शेवटी काहीही औषधोपचार न करता बाबांच्या उदीनेच त्याची आकडी थांबली. परंतु साई प्रसादचे दुखणे मोठ्या स्वरूपाचे असल्यामुळे त्याच्या डोक्याचे एक छोटे ऑपरेशन करावे लागले. ते ऑपरेशन व्यवस्थित पार पडले पण नंतर एक महिन्याने त्याच्या जखमेत पू झाला

आणि जे ऑपरेशन करुन टयूब घातली होती ती काढली. तेव्हां डॉक्टर म्हणाले की, पुन्हा उलटया झाल्या तर टयूब घालून ऑपरेशन करावे लागेल नाहीतर जरूर नाही. नंतर आम्ही पुन्हा डिसेंबर महिन्यात तो आजारी असतांनाच त्याला घेऊन शिर्डीला गेलो. तिथे वसतीगृहात आम्ही उतरलो होतो. तिथे तेव्हां माझ्या मुलाला अंथरुणावरुन उठून बसता येत नव्हते. पण अचानक कॉटवर तो उठून बसला. आहे की नाही बाबांची कृपा!

बाबांच्यावर भार टाकला की आपली कोणतीही गोष्ट किंवा संकट हळू हळू पार पडते. मात्र बाबांचे एकच सांगणे आहे कीं श्रद्धा आणि सबूरी धरा म्हणजे सगळे कांही तुमच्या मनासारखे होईल मी तुमच्या पाठीमागे आहे.

म्हणतात ना...जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव"

अशा या साई माऊलीचे आम्हा सर्वांवर असेच कृपाछत्र राहू दे.

## श्री साईलीला

### पुढील अंकाचे महाआकर्षण

अमरावतीचे ख्यातनाम साईभक्त व लो. टिळकांचे उजवे हात बॅ. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनी १९१० ते १९१२ हा तीन वर्षाचा काल शिरडीस श्री साईबाबांच्या प्रत्यक्ष सहवासात घालविला. आपल्या शिरडी वास्तव्यात त्यांनी एक इंग्रजी दैनंदिनी लिहीली ती "खापर्डे डायरी" या नावाने प्रसिध्द आहे. या दुर्मिळ दैनंदिनीचे सुरस मराठी रुपांतर आमच्या मराठी वाचकांसाठी पुढील अंकापासून क्रमशः सादर करीत आहोत.

श्री साईलीलाची आपली प्रत सुरक्षित ठेवण्यासाठी आजच वर्गणीदार व्हा.

वार्षिक वर्गणी १० रु. तहहयात वर्गणी ३०० रु.

# अन् सर्वांच्या चेहऱ्यांवर प्रसन्नतेची एक आगळीवेगळी छटा दिसू लागली


–डॉ. अनिल एन. मोरे
एम २३९ "साईधाम"
मु. धनसार, (अल्याळी आंबेवाडी,
ता. पो. पालघर' जि. ठाणे.


मनसोक्त आनंदाची शिदोरी पाठीशी बांधून मी गेल्या वर्षीच्या लेखक कवि संमेलनातून परतलो होतो. दोनच दिवस ह्या साईवेड्या लेखक कवि बरोबर होतो. परंतु जणू काही २० वर्षांचा स्नेह मी प्राप्त केलेला होता. फक्त महाराष्ट्रांतीलच नव्हे तर संपूर्ण भारत वर्षाचे साईवेडे दोन दिवस एकत्र जमतात. त्यांच्या सोबत घालवलेले क्षण क्षणोक्षणी याद होतात.

दिवस जसजसे जवळ जवळ येत चालले तसतसा मला ह्या आठवणींचा विरह असह्य होत होता. धुंद फुंद मैफिलीचा आस्वाद घेण्या साठी माझे मन आसूसलेले होते. कधी एकदाचा दिवस उजाडतो. २७ जानेवारी १९८५ अन माझ्या आनंदरुपी मनाचा भोवरा मोठ्या वेगानं फिरु लागतो.

ह्या संमेलनात येताना प्रत्येक साईवेडा नुसता आनंदाने भारावून जातो. सर्वांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेची झलक तरंगताना दिसते. आपल्या मित्रांना भेटण्यासाठीहि मने आतूर झालेली असतात. श्री साईच्या दरबारी हजेरी देण्याची एक वेगळीच ओढ सर्व श्री साईवेड्यांना सतावीत असते. परंतु ह्या वर्षीच्या संमेलनास येतानाहि मने एका मोठ्या दुःखाची शाल पांघरुन आलेली होती. त्यांच्या मनात झालेली जखम ओली असल्याने त्याच्या वेदनाही तेव ढ्याच तीव्र होत्या कारण ह्यानंतर कदाचित संमेलन होणार नाही हि बातमी ह्या साईवेड्यांना कळली होती. प्रचंड मोठा आघात होता. ह्या साई–वेड्यांच्या मनावर वर्षभर 'श्री साईलीला' मासिकाद्वारे भेटणारी ह्रदये, कविता व लेखाद्वारे एकमेकांशी हितगुज करणारीही मने वर्षातून एकाच व्यासपीठावर भेटणाच्या संधीपासून दूर होणार होती. कोणता अपराध

आम्ही केला होता कि एवढी शिक्षा साईबाबानं आम्हांस द्यावी हा प्रश्न सर्वच भवताना भेडसावित होता .

संमेलनाचं सत्र सुरु झाले तरीहि शरीरे अजून रंगात आलेली नव्हती अहो हा अपघात एकटया-दुकटयाचा नव्हता मुळीच तर समस्त साईवेडया लेखक कविच्या हृदयावर झालेला सामुदायिक आघात होता. त्यातून मार्ग काढण्यासाठी श्री साईना वेगळी विनवणी करण्याची गरज ती काय ? कारण अबालवृद्धांपासून जिथं जातपात, उच्चनीच ह्या सर्वांच्या पलीकडे जावून आपण फक्त साईसेवक ह्या भावनेपोटी श्री साईच्या लीला, चमत्कारानी भारावून गेलेली माणसं श्री साई लीला ह्या मासिकाद्वारे आपलं लिखाण करीत असतात. ह्या वेडयांना दुःखातून सोडविले नाही तर...

,तुमचा मी भार वाहिन सर्वथा। नव्हे हे अन्यथा वचन माझे।। ह्या उक्तिची प्रचीती कशी येणार ?

आणि नेमक तेच झालं श्री साईलीला मासिकाच्या लेखक कविंचे संमेलन हे पुढे असच चालू राहिल त्याचप्रमाणे ज्या ज्या साईभक्ताने श्री साईलीला मासिकाचा विकास कसा होईलं ह्या विषयावर जे विचार मांडले त्या संदर्भात हि आम्ही विचार करु. हे बोल आदरणीय प्रशासकीय अधिकारी श्री. बन्ने साहेब ह्यांनी काढले तेव्हां त्या सर्व साईवेडयांची मने आनंदानं ओथंबून गेली, त्यांच्या डोळयातून निघालेल्या आनंदाश्रूनी जणू बाबांना अभिषेक घातला "अन् सर्वांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेची एक आगळी वेगळी छटा दिसू लागली."
श्री. बन्ने साहेबांची ही शद्बमाला म्हणजे जणू श्री साईनी सर्व भक्तांवर दाखविलेली कृपादृप्टी किंवा समस्त साईवेडयांना दाखवलेला चमत्कार तर नव्हे ना ? हा प्रश्न सहज माझ्या समोर उभा ठाकला.

ह्या संमेलनाच वैशिष्ट म्हणजे श्री समर्थांना वाहिलेल्या आपल्या वेडया वाकडया शद्बांची काव्यमाला म्हणून श्री साईवर लिहिलेल्या ४-५ पुस्तकांची हीं प्रकाशन झाली. मोठा आनद म्हणजे श्री साईचे दर्शन घेतलेल्या श्री. पूज्य पोतदारांचही दर्शन व आशीर्वादही प्राप्त झाला.

पुन्हा एकदा नविन आनंदाचं गाठोडं-पाठिशी होते परंतु ह्या ११ व्या. संमेलनात जी मन एक दुःखान आली होती ती एक मोठा आनंद घेऊन परतली

होती. म्हणून हे संमेलन सर्वांच्या स्मरणात राहण्यासारखच गाजणार आहे एक गीत–

ताई माई भाऊ आक्का एक दिलानं चला रं ॥
आपसामंदी वैर कशाचं शिर्डी मंदी चला रे ॥धृ॥

जातीपातीन देशामंदी अनाचार हा माजला
एकजूट ती व्हईल कशी रं कापाकापिचा मामला
श्री साईच्या अवतारानं आता कशाची भिती रं ॥१॥

आई वडिल, जात पात पंथ मजला नाही ठावं रं
बाबा तुमच्या दर्शनाला रोध कशाची आली रं
योगमायेच्या चमत्कारान आम्ही सारे दिपलो रं ॥२॥

वराती बरोबर शिरडीग्रामी बाबा अमुचे आले
म्हाळसापतीच्या हाकेन ते साईबाबा झाले
काशीरामाच्या संकटसमयी साई क्षोभीत झाले रं ॥३॥

## श्री. बाळकृष्ण गुप्ते यांचे निधन

मुंबईचे साईभक्त श्री. बाळकृष्ण त्रिंबक गुप्ते यांचे दिर्घकालीन आजारामुळे निधन झाले. ते सेंट्रल बँक ऑफ इंडिया मध्ये एक वरिष्ठ अधिकारी होते. तेथून काही वर्षापूर्वीच ते सेवानिवृत्त झाले होते. प्रख्यात मराठी लेखिका, प्रा. डॉ. चारुशिला गुप्ते यांचे ते पती होते. चारुशिला बाईंनी साईबाबांवर अनेक लहान मोठी अशी साहित्य निर्मिती केलेली आहे.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवोत.

# सदैव हृदयी वसो मनासि ध्यानी साई वसो

श्री. रमेश डी. चव्हाण,
साईनिकेतन, गुजरलेन कॉर्नर,
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे
पिन ४२५४१८

० साधुसंत हीच भारताची संपदा. गेल्या शेकडो वर्षांच्या काळात भारतात अनेक साधूसंत जन्मास आले व जनतेला जागविण्याचे महत्तम कार्य पार पाडून निजधामास गेले. या विसाव्या शतकात श्री साईबाबा हे थोर संत होऊन गेले. त्यांनी कोणत्याही नवीन धर्माची किंवा पंथाची स्थापना केली नाही असे असले तरी त्यांचे स्थान अजोड आहे. श्री सद्‌गुरु साईंचे नाव अजरामर झाले आहे.

नदीचे मूळ व ऋषीचे कूळ विचारु नये असे म्हटले जाते. अगदी याच उक्तीप्रमाणे साईबाबा कोण? कुठून आले? जन्म कोणत्या कुळात झाला वगैरे कांहीही उपलब्ध नाही. त्यांच्या तोंडी नेहमी येणाऱ्या बोलीवरुन त्यांचा संबंध मोंगलाईशी असावा असे वाटते. औरंगाबाद जिल्ह्यातील धुपखेड्याचे चांदभाई ह्या गृहस्थाच्या वरातीबरोबर बाबा शिर्डीला आले. वरात शिर्डीत खंडोबाच्या देवळा जवळ उतरली होती. खंडोबाच्या देवळातील पुजारी म्हाळसा पती सोनार हे होते. बाबा जेव्हां खंडोबाच्या देवळात गेले तेव्हां म्हाळसा पतींनी त्यांना 'आओ साईबाबा' अशा शद्बांनी संबोधिले आणि तेव्हापासून 'साईबाबा' नावाने त्यांना सारे ओळखू लागले, आणि तेव्हापासूनच बाबा जे शिरडीत रमले ते थेट समाधी घेईपर्यंत.

श्री साईबाबांनी आपल्या वास्तव्याने शिरडीचा सर्वपरिसर पवित्र, प्रसन्न, समृद्ध व वैभवशाली बनविला. बाबांनी गरीब, श्रीमंत यांना जवळ केले. तद्वतच सर्व धर्माच्या व पंथाच्या लोकांनाही जवळ केले. ते आपल्या भक्तांना सांगत, "परमेश्वर सगळ्या चराचरामध्ये भरुन उरलेला आहे. त्याच्या इच्छेनुरुप जगाचे सर्व व्यवहार चालतात त्याची लीला अगाध आहे. तो ठेवील तसे रहावे. सदसद विवेकबुद्धी जागृत ठेवावी. सत्याचे पालन करावे. जीवन विषयक आसक्तिचा त्याग करावा. सर्व प्राणीमात्रांशी प्रेमाने व दयेने वागावे, आपापले कर्तव्य करीत रहावे. कुणाची निंदा अथवा भांडण करु नये. रिकामटेकडे बसू नये. ईश्वराचा नामजप करीत रहावे. इत्यादी.

श्री साईबाबा यासाठी जन्मभर झटले व जगाला अमर संदेश देऊन गेले. देह सोडून जातांना मात्र भक्तांना अमोल आश्वासने देऊन गेले.

ज्यावेळी मानवी प्रयत्न संपतात व आशेला जागाच रहात नाही अशा वेळी बाबांची प्रार्थना केल्याने उदी लावल्याने अशक्यप्राय गोष्टी शक्य झाल्याचे प्रत्ययास येते, व बाबा स्मरण केल्याबरोबर उपस्थित होतात. अशाश्वत जगात सुखापेक्षा दुःख अधिक, तेव्हा साहजिकच मनःशांतीसाठी माणूस शिर्डी मंदिराकडे धाव घेतो.

आजही शिर्डीत अनेक ठिकाणी साईबाबांची स्मृती सतत जागृत करत असते. समाधी मंदिर, लेंडीबाग, चावडी, निंबवृक्ष, गुरुस्थान, द्वारकामाई अशी कितीतरी नावे घेता येतील. बाबा ज्या मशिदीत रहात असत तिला द्वारकामाई या नावाने संबोधीत. बाबा एक दिवस चावडीत व एक दिवस द्वारकामाईत रहात. द्वारकामाईत बाबा ज्या चुलीवर स्वयंपाक करीत ती चूल निवार, जाते, पोते, अक्षयधुनी, बाबा बसत ती शिळा अन बाबांची भली मोठी मनोहारी छबी आहे. याच मशिदीत बाबा हयात असतांना लोकांना औषधपाणी सांगत व देत. ते त्यासाठी कधीही पैसा घेत नसत. वेळप्रसंगी रोग्यांची सेवा सुश्रुषा स्वतः करीत. पुढेपुढे आजाऱ्याला औषधपाणी देण्या ऐवजी ते उदी म्हणजे अंगारा देऊ लागले व त्यामुळे रोगी पूर्ण बरे होऊ लागले आजसुद्धा त्यांनी स्वहस्ते पेटविलेल्या धुनीतील उदीचा प्रभाव काय सांगावा ? सर्व दुःखांचे निराकरण करण्याचे सामर्थ्य उदीत असल्याची श्रद्धा सर्वत्र दिसून येत आहे.

समाधी मंदिर हे एक जागृत देवस्थान आहे. हजारो लोकांना त्याची प्रचीती येत आहे याच मंदिरात बाबांची समाधी व संगमरवरी हसरी, गोमटी अशी मूर्ती आहे. देशाच्या कोनाकोपऱ्यातून दर्शनासाठी भक्तांची रीघ लागते. समाधीपुढे डोके टेकल्यावर आपल्या दुःखाचा भार हलका झाल्याचे समाधान लाभते तेव्हा याद येते –

**"खरंच बाबा तुझ्या मंदिरात**
**जर कांही समाधान नसते**
**पुन्हा पुन्हां असे शिर्डीकडे**
**आमचे मन वळले नसते"**

शिरडीचे साईबाबा हे अलौकिक संत होऊन गेले. आजही त्यांच्या चैतन्याचा साक्षात्कार अनुभवास येतो. आपल्या हयातीत त्यांनी अनेक चमत्कार केले व आज समाधीनंतरही अनेकांना चमत्कार दाखवित आहेत.

मात्र बाबांचे चमत्कार म्हणजे गारुड्याचे खेळ नव्हे तर त्यात भगवद् गीतेतील तत्त्वज्ञानच भरलेले दिसून येते. बाबांनी चमत्कार दाखविण्याचे दुसरे कारण म्हणजे चमत्काराशिवाय नमस्कार नाही. ते सिद्ध कोटीला पोचलेले संत होते. बाह्यात्कारी साधे दिसणारे बाबा त्रिकाल ज्ञानी होते. भूत, वर्तमान व भविष्य त्यांना कळत असे. विलक्षण सिद्धी त्यांना प्राप्त होत्या. त्यांच्या चमत्काराचा प्रत्यक्ष अनुभव लाभल्यामुळे भक्तांची त्यांच्यावर नितांत श्रद्धा बसली.

साईबाबांनी कोणत्याही नवीन धर्माची किंवा पंथाची स्थापना केली नाही असे असले तरी आपणास झालेले ज्ञान सर्व लोकांना देऊन त्यांना सुखी करण्यासाठी झटावयाचे हीच त्यांची आकांक्षा होती. त्यांनी श्रीमंता बरोबरच गरीबांनाही जवळ केले. कुणी मोठा नाही, कुणी छोटा नाही आपण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. त्यामुळे जातीजमाती, धर्मधर्मात वैर असता कामा नये. सर्वात समभाव निर्माण झाला पाहिजे ही मानवतेची शिकवण दिली.

श्री साईबाबा सर्वांगाने सुंदर असून दयेचे सागर आहेत. त्यांना जे शरण जातील त्यांचा उद्धार ते निश्चित करतात. यमाच्या जाचणीपासून साई शिवाय कोणीही सोडविणार नाही. साईचे जरी कोणाला विस्मरण झाले तरी साई मात्र कधीही कोणाला विसरत नाही. मायबापाप्रमाणे ते भक्तांचे गुणदोष पहात नाहीत. सर्वांवर प्रेम करतात. साईनामाने अनेक तरुन गेले. तात्पर्य साईनाम जो उच्चारील त्याला काळाचे भय नाही. श्री साईनाथांचा अवतार मानवजातीच्या कल्याणासाठीच झालेला होता. ते नेहमी म्हणत असत–

'तुमचा मी भार
वाहीन सर्वथा
नव्हे हे अन्यथा
वचन माझे !'

फक्त त्यासाठी श्रद्धा आणि सबुरी हवी. श्रद्धा सबुरीने प्रार्थना केल्यास आजही साई सर्वांना पावतात एवढेच नव्हे तर त्यांच्या धुनीतील उदीच्या प्रभावाने कितीतरी भक्तांचे दुःखाचे निराकरण झाले आहे, आणि असा अनुभव जोपर्यंत साईवरील श्रद्धा कायम आहे तोपर्यंत येत राहील. यासाठी आपण एकच ध्यानात ठेवा.

"सदैव हृदयी वसो मनसि ध्यानि साई वसो
पदी प्रणय वोरसो निखिल दृश्य बाबा दिसो."

ॐ

# श्रीसाईचे ब्राम्हतेज

सौ. नीला अनिल रसाळ,
२०९३, गणेश कृपा, बेलबाग
रत्नागिरी

० श्री साईबाबा हिंदु होते असे म्हणण्याचा एखाद्या भक्ताने अट्टाहास धरला तर बाबा त्याला यवन दिसत. उलट एखाद्याने हे मुसलमान फकिर आहेत असे सिद्ध करावयास जावे तर बाबा आपल्या लीलांनी आपण संपूर्णतः हिंदु ब्राम्हण आहोत असे दाखवून त्या भक्तांचे डोळे दिपवून टाकीत. त्यांचे प्रत्यक्ष वास्तव्य शिर्डीत असताना पुष्कळ भक्तांनी साई हे हिंदु की मुसलमान हा वाद सोडविण्याचा प्रयत्न केला. पण अखेरपर्यंत कोणालाही त्यांच्या जन्मकालाचा व धर्माचा पत्ता लागला नाही, आणि कधींहि लागणार नाही. कारण जगाचा उद्धार करण्याकरिता प्रत्यक्ष श्री दयाधन परमेश्वरच साईंच्या रुपानं जो अवतरला त्याला हिंदु व मुसलमान हा भेद बाळगण्याचे काहींच प्रयोजन नव्हते. अज्ञानरुपी पंकात रुतलेल्या अभागी जीवाला हात देवून सन्मार्गाला लावण्याचे पवित्र कर्तव्य पार पाडण्याकरिता सद्गुरुच्या रुपाने या भूमीवर वेळोवेळी परमेश्वर अवतार घेतो. त्याला धर्माचे बंधन राखण्याचे काहीच कारण नाही. बाबांनी देखील हाच मार्ग अंगिकारला होता. राम रहीम हे एकच आहेत आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. शरीराचे व मनाचे पावित्र्य रक्षण करण्याकरिता आणि आत्म्याची उन्नती करुन घेण्याकरिता प्रत्येकाला धर्माची आवश्यकता आहे; सर्व धर्मांची तत्वे अत्यंत थोर आहेत, अशा प्रकारचे उदार धोरण ठवूनच बाबा हिंदुना हिंदु पद्धतीप्रमाणे व मुसलमानांना कुराणातल्या बांधवांप्रमाणे वागण्यास भाग पाडीत.

श्री साईबाबांनी रामनवमी सारखा पवित्र सण हिंदु भक्तांनी शिर्डीला अत्यंत उत्साहाने साजरा करावा अशी परवानगी दिली. मुसलमांनाला श्री बाबांनी त्याचवेळी उरुस व संदल काढण्यास मुभा दिली. सर्व भक्त मंडळी गोकुळ अष्टमीच्या दिवशी श्री बाबांसमोर दहीकाला नाच वगैरे कार्यक्रम साजरे करीत. मुसलमान लोक इदीच्या दिवशी मशिदीत येवून नमाज पढत.

श्री बाबांचे हिंदु पद्धतीप्रमाणे कान दोन्ही टोचलेले होते. त्यांनी स्वतः मशिदीला "द्वारकामाई" नाव ठेवून तिथे घंटा लावण्यास सांगितले व स्वतः धुनी सुरु करुन अग्नीची पुजा अर्चा चालू केली. भजने करणे, अग्नी पेटविणे,

घंटा टाळ वाजविणे, शंख वाजवणे. जात्यावर दळणं व स्वत: देवतेप्रमाणे पुजा करुन घेणे हे सर्व जिथी बाबा हिंदू होते याची साक्ष देतात. श्री बाबांचे भक्त थोडे साशंक असत कारण त्यांचा मुसलमान पद्धतींचा पोषाख, मशिदीत जाणे, उर्दू भाषा बोलणे इत्यादी गोष्टीमुळे श्री बाबांना खूप लोकांनी विचारण्याचा प्रयत्न केला. तुम्ही हिंदु आहात कीं मुसलमान. पण बाबांनी कोणाला थांगपत्ता लागू दिला नाही. कित्येक कर्मठ ब्राम्हणांनी बाबांना शंका कुशंका बाजूला सारुन साष्टांग नमस्कार केला आहे. श्री बाबांना कित्येक प्रसंगी काहीतरी अघटीत लीला दाखवून त्यांना मुग्धता धारण करण्यास लाविले. श्री बाबांच्या समाधी कालानंतरही कित्येक लोकांनी या प्रश्नांचे उत्तर मिळते का व मिळविण्याचे प्रयत्न केले पण सर्व व्यर्थ. कोणाला कळले नाही. व्यवहारात एखादी महान विभुती किंवा महान व्यक्ति मृत झाली तर त्याचे मागून त्यांच्या संपत्तीवर किंवा जागेवर हक्क शाबीत करण्याकरिता जवळचा नातेवाईक वारसदार म्हणून उभा रहातो. पण शिर्डी संस्थानची अफाट मालमत्ता आणि अलोट संपत्ती यांचा मोह कोणाला' कसा झाला नाही? परंतु लोक मात्र शिरडीला धावू लागले.

याचे खरे कारण हेच कीं, बाबा आयोनिज होते. त्यांचा जन्म कोणत्याही कुळात अगर धर्मांत झालेला नाही. जगाच्या इतिहासात ही काही अशक्य कोटीतील गोष्ट नाही. संत कबीर किंवा नामदेव महाराज यांच्या प्रमाणे साई हे सिद्ध सद्गुरु म्हणूनच शिरडीला अवतीर्ण झाले. साईनाथांच्या ठिकाणी पूर्ण ब्रम्हस्थिती बाणली होती. म्हणून हिंदू मुस्लीम हा भेद ते दाखवत नसत. तेव्हां बाबांच्या जन्मस्थानाची आणि धर्माची जास्त चिकीत्सा न करता परब्रम्ह साधलेले ते एक अवतारी पुरुष होते असे समजून आपले मस्तक त्यांचे पवित्र चरणी लीन व्हावे हेच योग्य होय.

श्री बाबा हिंदु होते या विधानाला पुष्टिकारक असा प्रसंग श्री बाबांचे भक्त नानासाहेब चांदोरकर यांनी लिहून ठेवला आहे. नानासाहेब हे बाबांची जवळून सेवाचाकरी करीत बाबांना स्नान घालणे अंग चोळणे अशी कामे करण्याचा नित्य प्रसंग असल्यामुळे बाबांच्या देहाचा अगदी जवळून सूक्ष्म अभ्यास करणे त्यांना शक्य झाले. नानासाहेबांच्या व मामलेदारांच्या म्हणण्या प्रमाणे बाबा हिंदु होते.

श्री बाबांनी कोणत्याच धर्माची अवहेलना केली नाही आणि फाजील अभिमान बाळगला नाही. बाबा उच्च कोटीला पोहोचलेले सत्पुरुष होते.

बाबांच्या भक्तांत हिंदुंचा भरणा जास्त होता. तरी पण त्यांनी इतर धर्मातील लोकांना कधी दूर लोटले नाही. मुसलमान, पारशी, यहुदी हे लोक त्यांचे भक्त होते. बाबांच्या बाबतीत गूज वाचकांनी विचार करावा म्हणजे स्वतः साईच त्यांना साक्षात्कार देतील.

**श्री राजाधिराज योगीराज परब्रम्ह श्री सच्चिदानंद**
**सद्गुरु साईनाथ महाराज की जय।**

# द्वारकाधीश–याचक

–श्री. वसंत वामन प्रधान.
श्री. गणाधीराज को. ऑ.
हाऊसिंग सोसायटी, लि. बि. नं. २
ब्लॉक नं. २, मिठागर रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८२.

शार्दूलविक्रीडीत –

**भिक्षापात्र करी हरी धरुनिया राही उभा सन्मुख**
**भाकर आण म्हणे गे माय मजला होवुनी तो याचक**
**भाग्ये थोर कुणी जयास घडला हा लाभ अलौकिक**
**लक्ष्मीकांत ऋणी करोनी बसले वानू किती कौतुक**

० हे कोण पुण्य पुरुष ज्यांनी शिरडीमध्ये द्वारकाधिश योगेश्वर भगवान साईनाथ आपल्या दारात उभे केले. केवढ ते भाग्यवंत ज्यांनी चतकोर भाकरीसाठी त्रैलोक्याधीपतीला आपल्या द्वारी याचक केले, इतकेच नव्हे तर अनंत काल श्रीसाई योगेश्वर शिरडीत अक्षय वास्तव्य करुन राहिले. भगवंताला ऋणी करणारे हे थोर पुरुष महाभारतकालात श्रीकृष्णाच्या सवंगड्याप्रमाण, साधेभोळे शेतकरी होते. जणू ते पूर्वाश्रमीचे गोकुळनिवासी भगवंताचे सहोदर होते. कालाच्या उदरातून बाहेर आलेल्या स्वयंप्रकाशित हिऱ्याला लोकोद्धारासाठी पृथ्वीच्या अंतापर्यंत समाधी मंदिरासारख्या जडावाच्या टिकावू कोंदणात जखडून ठेविले व पूर्वाश्रमीचे सुदामा व उद्धव अनुक्रमे श्रीसंत उपासनी महाराज श्रीसंत दासगणू महाराज या नामाभिधानाने उदयास आले असे म्हटल्यास ते

सार्थ ठरावे. राधाकृष्णामाई लक्ष्मीबाई, बायजाबाई अशा अनेक माता भगवंताला घास भरविण्यासाठी कष्टल्या. त्याचे श्रेय श्रीसाई योगश्वराने त्यांना तत्त्वज्ञानाच्या प्रात्यक्षिकात विश्वरुप दर्शन घडविले व त्यांचे जन्म सफल केले. बळीराजाच्या द्वारी बटू वामनाच्या रुपात पूर्वी भगवंत याचक म्हणून आले व त्रिपादभूमी दान मागीतली त्या तीन पावलात बळीने सर्वस्व दिले पण भगवंत बळीच्या द्वारी कायम द्वारपाल म्हणून तिष्ठत राहिले. शिरडी निवासी व बाहेरील एक - नीष्ठ साईभक्तांकरिता श्रीसाईबाबा कायम वास्तव्याला एक लाडके भक्त श्रीमान बापूसाहेब बुटी यांच्या भव्य वाड्यात मुरलीधराच्या गाभाऱ्यात देह ठेवून अदृश्य रुपाने चैतन्य पूर्ववत आहे तेथे आपण आपली सुखदुःखे त्यांना सांगतो व ती सर्व त्यांनी ऐकल्याची आपल्याला त्यांच्या प्रतिसादाने कळतात. तोंडाने न बोललेले संकल्प ते पुरे करतात याचा अनुभव आपण श्रद्धेने व सबुरीने घ्यावा अशी माझी नम्र विनंती आहे. इतरत्र किंवा आपल्या घरातील त्यांचे छायाचित्र म्हणजे प्रत्यक्ष त्यांचे दर्शन. श्रीसंत दासगणू महाराज श्री साईबाबा देहधारी असतानासुद्धा त्यांचा फोटो कीर्तन करताना समोर ठेवित व त्यांच्या घरातील देवात फोटो पूजीत असत. सद्भक्त श्री मेघाबाबा देहधारी असताना त्यांची प्रत्यक्ष पूजा करीत असे व वाड्यात त्यांच्या फोटोची आरती करीत असे यावरुन श्रीबाबांचा फोटो म्हणजे प्रत्यक्ष श्रीबाबाच असे मेघा मानीत असे, याच मेघाला दारे बंद असताना शेजेवर श्रीबाबांनी दर्शन तर दिलेच पण मेघाशी संवादही केला, त्याला आपले सर्व साक्षी विश्व अस्तित्व दाखविले व म्हटले ,माझीया प्रवेशा नलगे द्वार ।। ना मज आकार ना विस्तार।। वसे मी निरंतर सर्वत्र'. यवना संबंधी घृणा असलेला मेघा यवनरुप बाबांची प्रेमभराने पूजा करीत असे तर प्रत्यक्ष यवन असणारे पैगंबरवासी श्रीसंत अब्दुल्ला बाबा श्रीसाईबाबांची फुले वाहून द्वारकामाईत व समाधीवर पूजा करीत असत माझ्या माहितीप्रमाणे ते केवळ शाकाहारीच होते.

मानव दृष्टीला दिसणारे भेद परमेश्वराला अभेद आहेत हे प्रत्यक्ष श्री साईबाबांनी आपल्याला शिकविले. कुठल्याही धर्म ग्रंथांचे वाचन, कुराण, गीता, बायबल, ग्रंथसाहेब, वेद, उपनिषदे, या साऱ्यांचा अर्थ श्री बाबांना विचारा. माणूस म्हणून माणुसकीनं प्रथम पहा व हे भेद कुणी पाडले याचा शोध घ्या. सोवळे, ओवळे, स्पृश्य, अस्पृश्य काळा, गोरा हे वर्णभेद वैयक्तिक स्वार्थापायी माणूस पाळीत असून धर्माच्या नावाखाली परमेश्वराशी प्रतारणा करीत आहे. आजच्या समाजात श्री बाबा आमटे व तत्सम इतर कुष्ठरोग सेवक मदर टेरेसा

यांचे कार्य पाहिले की माणसातच देव आहे व ही संत मंडळी म्हणजे श्री साई-बाबांच्या कार्याची प्रेरणा होय. श्रीसाईबाबा सर्व प्राणी मात्रासी एकरूप होते. ते सर्वावर दया करीत. श्रीबाबांनी आपल्या आचरणाने लोकात बदल केला. साधारण ८० ते ९० वर्षांपूर्वीचा काळ लोक सनातनी होते, हे आपण सर्व जाणतो. अशा कालखंडात प्रतिष्ठित, गाढे विद्वान, आर्थिक संपन्नता असलेले ब्राम्हण या फकीराच्या सहवासात सहजीवन जगण्यासाठी राहिले याचे कारण त्यांनी चालता बोलता देव पाहिला त्यांची दृष्टी सम झाली म्हणून त्यांना समचरण दिसले. पंढरपुरातील सावळे परब्रम्ह श्री विठ्ठल श्रीसंत दासगणूचे आराध्य दैवत त्यांना शिरडीतच दिसले. म्हणून त्यांनी 'शिरडी माझे पंढरपूर साईबाबा रमावर' असे म्हटले. पुढे सत दासगणू प्रयाग तीर्थावर स्नानास जाण्यास श्रीबाबांची आज्ञा मागता बाबा म्हणाले अरे गणु तुझे प्रयागसुद्धा इथेच आहे. त्यावर श्रीदासगणू बाबांना म्हणाले मग ते मला दाखवा. व श्रीबाबांच्या चरणावर डोके ठेवताच त्यांना प्रयाग स्नान घडले श्रीसाई सत् चरित्रात याचे वर्णन व श्री संत दासगणूंचे प्रासादिक काव्य त्यात अंतर्भूत आहे. मी स्वतः हे वर्णन संत दासगणूचे तोंडून ऐकले आहे. साईचरित्र पंधराव्या अध्यायात श्री दासगणूना श्री साईबाबांनी नारदीय दीक्षा दिली ते त्या पदालाच अखंड नाम स्मरणाने विभूषित होते, त्यांच्या रोमरोमात विठ्ठलाचा नाद होता. श्रीसाई संत चरित्रा-तील अशी सारी अमोल नररत्ने आपल्याला श्रीचरणावर भक्तीचा प्रकाश देत आहेत व साईचरित्रकार श्री. आण्णासाहेब दाभोलकरांचा अखंड नंदादीप नव विधाभक्ती स्रवत आहे. इथला सारा आसमंत मंगलमय आहे. इथे अमंगलाला थारा नाहीं. इथे आपल्या जीवनाचा विसावा आहे. आपल्या साईमाऊलीचे श्रीमुख वात्सल्याने ओथंबले आहे साऱ्या जगातले कारुण्य त्या मुखावरुन ओसंडत आहे. ती दयार्द्र प्रेममय वात्सल्यमूर्ती पाहताच आपण सर्वस्व विसरतो व लहान अर्भक व्हावे साई माऊलीच्या पदराखाली जावे प्रेमरसाचे मनसोक्त पान करावे स्वतःला हरवावे बाल्यातीला निर्मळ आनंद उपभोगावा. लहान नाहीं, मोठा नाही गरीब नाहीं, श्रीमंत नाहीं, ज्ञानी नाहीं, अज्ञानीही नाहीं जे आहे ते फक्त एकच अनेकातला एक अनामिक बिंदू. त्या करुणा सिंधूचा अंश स्वतंत्र अस्तित्व नसलेला आपण जेव्हां जीवनाच्या वाटचालीत थकलेले असाल तेव्हां आई च्या दर्शनाला जगन्मातेच्या भेटीला शिरडीला याल तेव्हां द्वारकाधिश याचकाची फकीर वेषातील पावले इथल्या मातीवर उमटलेली दिसतील. ती काळालाही पुसता येणार नाहींत. कारण इथली सारी मातीच भगवंताच्या चरण स्पर्शाने पुनीत आहे तिचा स्पर्शच आपले सारे जीवन बदलील.

(पान १६ वरून)

काशीत त्यावेळी विशाल धर्मदृष्टी, अक्षुण्ण सदाचरण, अगाध ज्ञान, व व्यापक महानुभाव यांचेमुळे स्वामी रामानन्द यांच्या पवित्र नावाचा खूपच बोलबाला होता. ते रामानुजांच्या शिष्य शाखेतले होते. रामानुज वैष्णव होते. त्यांच्या शिष्य संप्रदायात ब्राम्हणेतरांना प्रवेश नव्हता. रामानजीय संप्रदायात रामानंदी शाखेची संस्थापना करुन व शूद्रादिकांना शिष्यत्वाची दीक्षा देऊन स्वामी रामानंदांनी ती उणीव भरुन काढली होती. सुप्रसिद्ध संत रोहिदास चांभार हे याच शिष्य शाखेत प्रविष्ट झाले होते. स्वामीजींनी आपल्याला शिष्य करुन घ्यावे अशी कबीराची आकांक्षा होती. त्यासाठी कबीरांनी एक युक्ति शोधून काढली.

सूर्योदयापूर्वी जागे होऊन काशीच्या मणिकर्णिका घाटावर स्वामी रामानंद नित्य गंगास्नानास जात. एकदा कबीर मध्यरात्री उठले व स्वामीजी ज्या वाटेने गंगेत उतरत त्या वाटेत घाटाच्या एका पायरीवर अंगाचे मुटकुळे करुन पडून राहिले. स्वामीजी आपल्या नियमानुसार जागे झाले व घाटाच्या पायऱ्या उतरू लागले, तोच त्यांचे पुण्य पाद कबीरांचे अंगावर पडले. त्या बरोबर स्वामीजींचे मुखावाटे 'राम–राम' असे उद्‌गार बाहेर पडले. तेव्हां 'राम–राम' हाच गुरु मंत्र मानून कबीर स्वामीजींचे पाया पडले व म्हणाले – आपण मला रामनामाचा गुरुमंत्र दिलात आजपासून मी आपला शिष्य झालो आता मला आपल्या पायापासून दूर लोटू नकात. या गुरुभक्तिमुळे स्वामीजींचे नवनीत कोमल अंतःकरण विरघळले. त्यांनी कबीरांना उचलून आपल्या पोटाशी धरले व शिष्य म्हणून मान्य केले. अशा प्रकारे कबीर हे रामानंदांचे शिष्य झाले.

मुसलमानामधील सूफी मताचे अनुयायी कबीरांना झांशीच्या शेख तकीचे शिष्य समजतात. पण स्वतः कबीरांनी 'सुन हु तकी तुम सेख' असा तकींच्या नावाचा बरोबरीच्या नात्याने उल्लेख केला असून 'काशी में हम प्रकट भये है रामानन्द चेताए' असा स्वामीजींच्या नावाचा विनयपूर्वक उल्लेख केलेला आहे. यावरुन ते शेख तकीचे शिष्य नसून स्वामी रामानंदांचेच शिष्य होते हे खास.

कबीर विवाहित होते. एका वनवासी, वैराग्याने मायेने लालन पालन केलेल्या 'लोई' नामक कन्येशी त्यांचा विवाह झालेला होता. ती सुंदर व सद्‌गुणी होती. एकदा कबीरांकडे काही संत अगदी अनपेक्षित अतिथी म्हणून आले. त्यावेळी त्यांचे सत्कारार्थ त्यांचे घरात काहीही नव्हते. लोईच्या सौंदर्यावर

वाण्याचा एक मुलगा भाळलेला होता. लोई कबीरांना म्हणाली "तुमची संमति असेल तर मी त्या वाण्याच्या मुलाकडून काहीं पैसा आणते" कबीरांच्या संमतिने तिने पैसा आणला आणि अतिथी परतले म्हणजे आपण भेटू असा त्या मुलाशी वायदा केला. सत्कारानंतर अतिथी परतले. यावेळी तुफान होऊन पाऊस पडत होता. तरी कबीरांनी लोईला आपल्या खांद्यावर घेतले व त्या मुलाकडे नेले. कबीरांची ही सत्यप्रियता पाहताच त्या मुलाला अनुताप झाला व त्याने 'लोई'चे 'आई' म्हणून पाय धरले. लोई पासून कबीरांना कमाल व कमाली नावाची दोन मुले होती. कमालने आपल्या प्रमाणेच भक्त व्हावे व साधुसंतांची सेवा करावी अशी कबीरांची इच्छा होती. पण कमाल व्यापार करु लागला व त्यात तो बुडाला. अर्थातच हे कबीरांना आवडले नाहीं.

कबीरांनी आपला कापड विणण्याचा परंपरागत व्यवसाय कधी सोडला नाहीं. आपल्या नित्यकर्मात मग्न राहूनही ते भक्ती करीत. स्वभावाने ते अतिशय उदार होते. ते विणलेले कापड बाजारात विकायला म्हणून नेत व कित्येकदा एखाद्या साधूला ते दान म्हणून देत व परत येत. पैशाच्या बाबतीत ते निरिच्छ होते.

कबीरांनी प्रवास भरपूर केला. भारताबाहेर ते बल्ख पर्यंत गेले होते. यामुळे त्यांचे ज्ञानात व अनुभवातही भरपूर भर पडली होती.

कबीरांचे शिक्षण झाले नव्हते. लौकिक दृष्टचा ते निरक्षर होते. त्यांनी जे साहित्य निर्मिले ते सारे मौखिक आहे.

कबीर संत समागम करीत. चर्चा करीत एकांतात चिंतन करीत. शिष्यांना व अन्य जनांना उपदेश करीत. भजन करीत. व हे सारे करीत असताना त्यांच्या मुखाने भक्ति-ज्ञान, व वैराग्य यांनी मुक्त असलेली वाणी अस्खलीत स्त्रोताप्रमाणे वाहू लागे. हा स्त्रोत पद्यमय असे. 'बीजक' हा त्यांचा सर्वमान्य ग्रंथ आहे. आणि 'शब्द', 'रमैनी' 'साखी' इ. त्यांचे साहित्य विशेष लोकप्रिय आहे. साखीत ५ हजार दोहद्यांचा समावेश आहे.

कबीर जन्मभर काशीस होते. परंतु अंतकाळ समीप आला तसे ते मगहरला निघून गेले. काशीत ज्याला मरण येते त्याला स्वर्ग प्राप्त होतो. कबीरांना स्वर्ग नको होता. पुनर्जन्म घेऊन जनसेवा करण्याची त्यांची आकांक्षा होती. त्यासाठी ते मगहरला गेले, व तिथे त्यांचा अंत झाला.

कबीरांचे देहांत होताच हिंदु व मुसलमान शिष्यात झगडा सुरू झाला. परंतु त्यांच्या मृत देहावरचे शववस्त्र दूर करण्यात आले त्यावेळी लोकांना पुष्प राशीचे दर्शन घडले. तिच्यातील काहीं फुले हिंदु शिष्यांनी काशीस नेली व त्या निर्माल्यावर तिथे "कबीर चौरा" बांधला. तो आजमितीस कायम आहे. मुसलमानांनी काहीं फुले मगहरला नेली व तिथे त्यावर थडगे बांधले ते अजून तिथेच आहे. या अद्भूत कथेचा अर्थ एवढाच की कबीरांच्या देहांता नंतर हिंदु व मुसलमान या दोन्ही जमातींनीं दिलजमाई केली व त्यांच्या स्मरणार्थ निरनिराळी स्मारके बांधली.

महात्मा कबीर हयात असतानाच अनेकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले होते. त्यांच्या पश्चात् 'कबीर पंथ' अस्तित्वात आला तो आजमितीस चालू आहे. या पंथाच्या अनुयायांची आज संख्या दहा लक्षाहून अधिक आहे. उत्तर व मध्य प्रदेश येथे या पंथाचा जोर विशेष, अन बिहार, गुजराथ, व पंजाब येथे कमी आहे. महाराष्ट्र, मद्रास, कर्नाटक यामध्ये तो फारसा आढळत नाहीं. या पंथाच्या एकूण १२ शाखा आहेत. यापैकी श्रुत गोपालदास यांची शाखा परंपरागत व प्रमुख असून काशी येथील कबीर चौरा, मगहर येथील समाधी व द्वारका नि जगन्नाथपुरी येथील मठ यावर तिचा ताबा आहे.

कबीरांचे एक प्रमुख शिष्य भगवानदास कबीरांचा 'बीजक' ग्रंथ घेऊन पळाले होते म्हणून त्यांना थट्टेने 'भग्गूदास' हे नांव मिळाले होते. त्यांनी त्या ग्रंथात काही फेरफार केला असे म्हणतात.

कबीर जन्माने मुसलमान कोष्टी – मोमिन होते. ते रामभक्त होते पण त्यांचा राम निर्गुण निराकार राम होता. मूर्ति पूजेवर. त्यांचा विश्वास नव्हता. कबीरांनी आपल्या उपदेशातून सत्य व ज्ञान यावर जास्त भर दिलेला आहे. भक्तीचा उपदेश करताना कबीरानी ईश्वरातील तार्कीक सत्यता स्थिर ठेवण्याचा यत्न केला. आहे. त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. अंध विश्वास त्यांचेपाशी नव्हता. त्यांनी हिंदु व मुसलमान या दोघांच्या संघर्ष काळात दोघांनाही उचित हितकर असे विचार विरोधाची पर्वा न करता जनतेसमोर मांडण्याचे साहस केले, व त्यापायी झालेला त्रास, कष्ट निमूटपणे सहन केले. यामुळे कबीरांना समाज सुधारक असेही म्हणतात.

कबीरांनी खोटे ज्ञान, खरे ज्ञान, दुर्बुद्धि, प्रतिभा, सत्संग, कुसंग, गुरु, असद्-गुरु, समदृष्टी, अहिंसा, दया, क्षमा, काम, क्रोध, मद, लोभ, इ. विविध विषयांवर

जो उपदेश केला आहे तो दैनिक जीवनात मोलाचा व महत्त्वाचा आहे. कर्मकांड, अवतार वाद, हिंसा, प्रतिभा, पूजन, व्रतवैकल्ये, वर्णाश्रमधर्म इ. विषयी कबीरांची जी वचने आहेत ती अत्यंत तीव्र असून त्यातून त्यांनी मिथ्याचारावर झोड उठविलेली आहे. आपल्या साध्या, सरळ, सोप्या उपदेशांचा विचार त्यांनी लोकांसाठीच केला. म्हणून कबीरांना विभूती, महात्मा या नावाने संबोधले जाते.

कबीरदासांवर आजवर ७५ ग्रंथ प्रकाशित आहेत. रेव्हरंड जी. ए. वेसकट यांनी 'कबीर अँड दी कबीर पंथ' हा इंग्रजी ग्रंथ लिहिला असून, डॉ. हंटर व मि. विल्सन यांनीही बरीच रचना केली आहे. डॉ. हजारी प्रसाद द्विवेदींनी कबीरावर डॉक्टरेट मिळविलेली आहे. आचार्य क्षितीमोहन सेन यांनी बंगालीतून लिहिलेल्या ग्रंथातील कबीरांची पदे वाचून रविन्द्रनाथ टागोर खूष झाले व त्यांनीही कबीरांच्या १००० पदांचे इंग्रजीत भाषांतर केले. अशा या विभूतीला प्रणाम.

# छोट्या साईभक्तांसाठी

◦ तुमचे श्रीसाईबाबा विषयक सामान्य ज्ञान किती आहे?

१) श्री साईबाबांची शिरडी .......... जिल्ह्यात आहे
(अ) अहमदनगर, (ब) बेळगाव, (क) कोल्हापूर, (ड) सोलापूर

२) ........ हे साईबाबांवरील लिहिलेल्या पोथीचे नाव होय.
(अ) रमैनी, (ब) विजक, (क) सच्चरित्, (ड) अमृतानुभव.

३) ओवीमय श्रीसाईपोथी ही जगप्रसिद्ध पोथी ....... यांनी रचलेली आहे.
(अ) अवस्थी, (ब) चांदोरकर, (क) रेगे, (ड) दाभोलकर.

४) श्री साईबाबा हे ......स्वामीजींचे अवतार समजले जातात.
(अ) अक्कलकोट, (ब) राधाकृष्ण, (क) नरसिंह, (ड) माधवनाथ

५) बाबांच्या मस्तकावर मिरवणूक प्रसंगी छत्री धरणारा ...... शिंदे हा महारोगी होता.

(अ) अण्णाजी, (ब) भागोजी, (क) अवधूत, (ड) रामराव.

६) श्री साईबाबांच्या आशिर्वाद आदेशावरुन ......... यांनी महाराष्ट्रातील संतांची सुंदर सुंदर चरित्रे लिहिली.

(अ) अब्दुलबाबा, (ब) दामुशेट कासार, (क) साईशरणानंद, (ड) दासगणू.

७) शिरडीच्या खंडोबा मंदिरातील पुजारी .......... यांनी बाबांना प्रथम 'साईबाबा' या नावाने पुकारले.

(अ) गोपीनाथ, (ब) काशीराम, (क) म्हाळसापती, (ड) गुरुनाथ

८) श्री बाबांचे शिरडीतील समाधी मंदिर गोपाळराव ...... यांनी बांधले.

(अ) गुंड, (ब) पुंड, (क) कोते पाटील, (ड) बुट्टी.

९) श्रीसाईंचे महानिर्वाण .......... झाले.

(अ) रामनवमीस, (ब) गुरुपौर्णिमेस, (क) विजयादशमीस, (ड) आषाढी एकादशीस.

१०) बाबांनी निर्वाण समयी .......... या सेवाभावी स्त्रीस ९ रु. दिले.
(अ) लक्ष्मीबाई (ब) बायजाबाई, (क) भिमाबाई (ड) ताराबाई

११) श्री साईनाथांनी निर्वाणापूर्वी वझे नामक भक्तास आपल्या जवळ बसवून त्यास ........ या ग्रंथाचे पारायण करण्यास सांगितले होते

(अ) हरि विजय, (ब) रामविजय, (क) पांडवप्रताप, (ड) भक्ति विजय.

१२) बाबा ......... बसून भक्तांना नेहमी दर्शन देत असत.

(अ) लेंडीबागेत, (ब) द्वारकामाईत, (क) मारुती मंदिरात, (ड) चावडीत.

### उत्तरे

(१) – अ, (२) – क, (३) – ड, (४) – अ, (५) – ब, (६) – ड, (७) – क, (८) – ड, (९) – क, (१०) – अ, (११) – ब, (१२) – ब.

★ ★ ❖

## साई आनंदाचे स्थळ

साई आनंदाचे स्थळ । साई सुखाची केवळ ।
नाना संतोषाचे मुळ । ते हे साई ॥
साई मोक्षाची विश्रांती । साई तृप्तीची नितृप्ती ।
साई धर्मांचे धर्मक्षेत्र । साई स्वरुपाचे सत्पात्र ।
साई समाधीचे मंदीर । साई विवेकाचे भांडार ।
साई समर्थपणे उदार । जे कां अत्यंत दानशूर ?।
साई सत्वाचे सागर । बुद्धिचे आगर ।
स्फुर्ती किरणाचे दिनकर । प्रेमळाची विश्रांती ।

–श्री. वि. दा. कुळकर्णी
विष्णू निवास
पोस्ट वांगणी जिल्हा ठाणे

# क्षितिज मी शोधतो

ओंजळ वाहता भावकळघांची मकरंदी तुज पाहतो
ब्रम्हांडाच्या गर्भात तुमचे क्षितिज मी शोधतो ॥

तुझी ब्रम्हांडे अनंत कोटी
चंद्र चांदण्या तुझ्याच ज्योती
सौदामिनिचे रूप घेऊनी मेघ नभी गर्जतो
ब्रम्हांडाच्या गर्भात तुमचे क्षितिज मी शोधतो ॥१॥

गोदातिरीचा तू सिद्धेश्वर
हिमशिखरावरी तूच महेश्वर
पुण्यभूमी ही अमर जाहली धुनी निखारा फुलतो
ब्रम्हांडाच्या गर्भात तुमचे क्षितिज मी शोधतो ॥२॥

कितीक नेलेस मोक्षपदाला
चोरपाखंडी यम सदनाला
तुझ्या मनीचा क्रोध अनामिक तरंग जली पेटतो
ब्रम्हांडाच्या गर्भात तुमचे क्षितिज मी शोधतो ॥३॥

लीला दाविल्या किती त्या अगम्य
मनी नाम जागो तुझे साई रम्य
अयोनिज तुम्हा करस्पर्शात अभयदान मी मागतो
ब्रम्हांडाच्या गर्भात तुमचे क्षितिज मी शोधतो ॥४॥

**–श्री. प्रकाश विठ्ठल परब**
२१–१६ वरळीं बी डी डी चाळ
मुंबई ४०० ०१८

# अखंड धुनी

चिमटा आपटला साईनी
मशिदी कशी पेटली धुनी? ।।धृ.।।

धुनी पेटली अखंड ठरली
साईस्पर्शे पुनीत झाली
परतण्याची संमती देती
बाबा, भाळी उदी लावूनी
मशिदी कशी पेटली धुनी? ।।१।।

साईकृपेस्तव शिरडी पुनीत
शिरडी जनता झाली पुनीत
मशीदी – चावडी – मंदिरी
भक्तजणांची साई जननी
मशिदी कशी पेटली धुनी ? ।।२।

आम्ही भक्तगण अती भाग्यवान
आम्हां चिडीसम नेले बांधून
उदीरुपी संजीवनी सेवूया
श्रद्धा सबूरीला नमुनी
मशिदी कशी पेटली धुनी? ।।३।।

डॉ. सौ. मालतीबाई रहाटे
मेडिकल ऑफिस,
सामान्य रुग्णालय,
मु. जि. भंडारा.

# प्रभुकृपा

मनांच्या ठायी, नसावा स्वार्थ,
प्रेमानं साधलं, खरा परमार्थ ॥१॥

ज्याचं मनं, निष्पाप निर्मळ,
तयासी मिळे, भक्ता फळ ॥२॥

देह कष्टविता, अतिव दुःख,
शिणल्या देहास, मिळेल सुख ॥३॥

दुसऱ्याचं भलं, असावं अंतरी
पुण्याईचं माप, त्याच्या पदरी ॥४॥

संसारी मनी, नसावी चिंता,
काळजी वहाणारा, आहे अनंता ॥५॥

लोभ–मोह, उपेक्षा–मत्सर,
सोडूनि देता, भेटेल ईश्वर ॥६॥

काम–धामात, मिळे विसावा,
अंतरी भक्ती, भाव असावा ॥७॥

उठता–बसता, जपा हरीनाम,
भोळ्या भक्तीत, दिसलं प्रभुराम ॥८॥

संसारातूनी भक्ती, केली अपार,
त्याच्यासाठी उघडलं, स्वर्गाचं दार ॥९॥

हृदयी असावं, भगवंत रूपा,
साई जीवन, होईल प्रभुकृपा ॥१०॥

–श्री. दत्तात्रय शंकर म्हेतर.
१०।६९५ स्वामी चाळ, बंडगर माळ,
इचलकरंजी (जि. कोल्हापूर) ४१६ ११५

# श्रीसाईस्तुती

(चाल – अब तेरे सिवा कौन मेरा कृष्ण कन्हैया')

तव चरणी ठेवूनी माथा नमितो गुरु साईनाथा
साईनाथा साईनाथा अनाथांच्या नाथा साईनाथा कृपावंता ॥धृ.॥

दत्तगुरु माऊली तव ठायी दिसली
जन्म मरणाची हो माझी फेरी चुकविली
धावत येई प्रसन्न होई स्वामी अवधूता
साईनाथा साईनाथा अनाथांच्या नाथा ॥१॥ ......

सुखद मंत्र राम, रहिम जपुनी अंतरी
शांती मंत्र भगवान येशू बुद्धांचे परी
सुख समृद्धीचे दान देवूनी तारिले भक्ता
साईनाथा साईनाथा अनाथांचा नाथा ॥२॥ ......

मानवताही जगताला दाविली खरी
भक्तांसाठी मानवरूपी आले भूवरी
शिरडी क्षेत्र पावन केले भुवनी आता
साईनाथा साईनाथा अनाथांच्या नाथा ॥३॥ ......

अवघे नाम गोड तुझे मनी चिंतनी
भाव धरूनी दत्ता खळेकर बोले वचनी
तव नामाचा महिमा अगाध हरली भवचिंता
साईनाथा साईनाथा अनाथांच्या नाथा साईनाथा कृपावंता ।४॥

–श्री. द. गो. खळेकर.
मु. पो. मुळानगर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.

# आनंदाच्या हिंदोळयावर

आनंदाच्या हिंदोळ्यावर मन झोके घेई
साईराम साईराम सदा भजन गाई . . . ॥धृ.॥

द्वारकामाई शिर्डीत भक्तगण जमले
घेण्या दर्शन बाबांचे पहा आतुर झाले
ऐक ऐक चला पुढे करू नका हो घाई
आनंदाच्या हिंदोळ्यावर . . . ॥१॥

सबका मालिक एक तेच ते साईबाबा
राम रहिम एक अवतार साईबाबा
दर्शनाने श्री बाबांच्या मन प्रसन्न होई
आनंदाच्या हिंदोळ्यावर . . . ॥२॥

वंदुया चरण साईचे या हो क्षणोक्षणी
करतील रक्षण बाबा, आमचे त्याच क्षणी
साईबाबा आहेत सर्वांचे माता-पिता, भाई
आनंदाच्या हिंदोळ्यावर . . . ॥३॥

—श्री. विजयकुमार जयदेव चिंदरकर
मु. पो. ता. कणकवली
जि. सिंधुदुर्ग, ४१६६०२.

# साई साई नाव घेता

साई साई नाव घेता
अंगी येते नवे बळ
उमलते दलदल
अंतरंगी ॥१॥

उमलल्या अंतरंगी
सुगंधून येती भाव
मुखी येते एक नाव
साई साई ॥२॥

नाव एक साई साई
देई जीवनाला रंग
चित्त होई नित्य दंग
एकरुप ॥३॥

एकरूप चित्ती तेव्हां
फक्त प्रकाशाची वाट
दाखविती साईनाथ
तेचि सुख ॥४॥

प्रकाशल्या वाटेवर
नाहीं चिंता नाही भय
सुख लाभते अक्षय
साई साई ॥५॥

–श्री. कृ. त्र्यं. हवालदार.
गंगाधर निवास, जय चामराज नगर,
नेहरु स्टेडियम जवळ,
टाऊन हॉल मागे, हुबळी–२०.

# साई अमृत साई अमृत

(चाल – दिगंबरा दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा)

साई नाथा साई नाथा । दुःख निवारक साई नाथा ॥
साई नाथांचे स्मरण करा हो । साई नाथांचे भजन करा ॥धृ.॥

साई नाम हे चिंता निवारक
साई नाम हे दैन्य निवारक
विश्वबंधुत्वाचा सोहळा पाहाया । शिर्डी गावी गमन करा ॥१॥

साई कृपा हे फळ श्रद्धेचे
साई कृपा हे फळ सबुरीचे
दृढ बुद्धि ठेवा साई ठायी । चिरंतन साई त्याचे हृदयी ॥२॥

नित्य प्रचिती सातत्याची
गुरु किल्ली ही मनी सुयशाची
साईचरणी शरण जाहला । वाया गेला ऐसा नाही दाखला ॥३॥

वाहिल भार साई सर्वथा
नसेल अन्यथा वचन साईचे
मिळेल तेथे सहाय्य सकला । लाभेल जे जे मनीचा ध्यास ॥४॥

सदैव तुझिया चरणी माथा
नाही अन्य मुक्ति गाथा
साई पुष्पांचा गंध बहरला ः प्रसन्न गमला निज चित्ताःला ॥५॥

साई नाथा साई नाथा दुःख निवारक साई नाथा ।
साई नाथा साई नाथा चिंताविनाशक साई नाथा ।
साई नाथा साई नाथा वैभवदायक साई नाथा समूह स्वरात
साई नाथा साई नाथा भाग्यविधाता साई नाथा ।
साई नाथा साई नाथा सर्व गुण संपन्न साई नाथा ।

सद्गुरु साई नाथ महाराज की जय.

श्री. प्रल्हाद सखाराम माळी .
स. नं. ८, गोरे चाळ,
कर्वे नगर , पुणे ४११ ०२९ .

# साईदेवा

ओ साईनाथा ओ साईनाथा
तू माझा देव
माझ्या अंतरी तुझाच ठाव
उपकार तुझे अनंत
जन्मो जन्मी राहू दे हीच प्रीत
तुझा भक्त लाडका मी असे
त्याची मज प्रचिती येतसे
रोज रोज आळवितो मी तुला
त्याचे सुख वाटतसे मला
ओ साईदेवा 'युवराज' तुझ्या पदी होई नम्र
तुझी गुणगाथा गाऊनी समग्र ।

– डॉ. वाय. एन. हिबारे.
सिंगार बाग, घर नं. १–८–२५,
पोस्ट बीदर, जि. बीदर,
कर्नाटक – ५८५ ४०१.

# साईबाबांचा अभंग

(ताल – भजनी)

साई नाम पुण्य हे किती ।
शिरडी गावी संत म्हणवूनी ।
मशिदी ते रहाती ॥धृ.॥

मशिदी माजी धुनी पेटवुनी ।
रात्रंदिन ते दिवे लावुनि ।
भक्त जनाना दिक्षा देऊनि ।
मार्गचि दाविती ॥१॥

संत थोर हे शिरडी गावी ।
उदी प्रसादे, लीला दाविती ।
लीला पाहुनि संताच्या ह्या ।
जन विस्मय करिती ॥२॥

## साई स्तवन

(ताल – दादरा)

वंदिन मी नाम हेचि साई प्रभुवराचे ।
तत्त्व हेचि भाग्य पुण्य मानवी जनाचे ॥धृ.॥

गाईन मी गोड नाम ।
पाहिन हे रुप छान ।
आलिंगुनी कवटाळिन पाय गुरुवराचे ॥१॥

गुंफिन मी पुष्पहार ।
घालिन मी गळा भार ।
आनंदे नाचिन मी ताल, संगीताते ॥२॥

साई तुझी ही सेवा ।
मानून घे तू देवा ।
पावन करि मजलागी, दासि ह्या सतीचे ॥३॥

व्ही. ए. किरपेकर, फोटोग्राफर
४०५ सोमवार कराड
जि. सातारा.

# श्रद्धांजली



ह्या मासिकाचे भूतपूर्व कार्यकारी संपादक प्रा. द. दि. परचुरे ह्यांना १ जून १९७३ ला तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने अचानक मृत्यु आला. त्यांची ह्या मासिका विषयीची आस्था इतकी जबरदस्त होती की त्यांनी मृत्युच्या आदल्याच दिवशी दिनांक ३१ मे १९७३ ला साई संस्थानच्या कार्यालयात जाऊन जून १९७३ चे अंक पोस्टात पडण्याची व्यवस्था केली होती.

गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून जरी ते सिद्धार्थ कॉलेजमध्ये काम करीत होते व तो विषय शिकविण्याची त्यांची हातोटीही नावाजलेली होती, तरी त्यांचा इंग्रजी व मराठी वाङमयाचा अभ्यास चांगला होता व ह्या दोनही भाषांवर त्यांचे प्रभुत्वही चांगले होते. धार्मिक वाङमय व भारतीय तत्त्वज्ञान ह्यांच्या प्रदीर्घ अभ्यासामुळे ते प्रवचन व कीर्तने करु लागले होते व त्या द्वारा साई भक्तीचा प्रचार करीत असत. साईबाबांच्या कीर्तनांचा सप्ताह साजरा करणाऱ्या लोकांसाठी त्यांनी साईबाबांच्या चरित्रावर व शिकवणुकी-वर आ कीर्तने रचली होती व ती शिरडी संस्थानने "साई कीर्तनमाला" ह्या नावाने पुस्तकरुपाने प्रसिद्ध केली आहेत. मुलांच्या मध्ये साईभक्तीचा प्रसार व्हावा ह्या उद्देशाने त्यांनी प्रथम "मुलांचे साईबाबा" हे छोट पुस्तक मराठीत लिहिले व नंतर ते इंग्रजीमध्येही भाषांतरीत केले. ते आता बऱ्याच अन्य भारतीय भाषांत भाषांतरीत झाले आहे आणि मुलांना फार प्रिय आहे.

आपल्या आयुष्यामध्ये साईभक्तीच्या प्रसारासाठी ज्यांनी फार कष्ट घेतले त्या प्रा. परचुरे ह्यांना दि. १–६–१९८५ ला येणाऱ्या त्यांच्या बाराव्या श्राद्धदिनी आम्ही प्रेमादरपूर्वक श्रद्धांजली वहात आहों.

– संपादक .

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२–०० | ६–०० |
| २) | " | इंग्रजी | १३–५० | ४–०० |
| ३) | " | हिंदी | १२–०० | ४–०० |
| ४) | " | गुजराथी | १२–०० | ४–०० |
| ५) | " | कन्नड | १०–०० | ४–०० |
| ६) | " | तेलगू | १३–०० | ४–०० |
| ७) | " | तामीळ | १२–०० | ४–६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७–५० | ३–०० |
| ९) | " | हिंदी | ७–०० | ३–५० |
| १०) | " | गुजराथी | ४–२५ | ३–०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४–०० | ३–०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०–३५ | ३–०० |
| १३) | " | गुजराथी | ०–३० | ३–०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०–५० | ३–०० |
| १५) | " | गुजराथी | ०–५० | ३–०० |
| १६) | तेलगू पूजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १–२५ | ३–०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५–०० | ३–०० |
| १९) | कीर्तनमाला | मराठी | ०–७५ | ३–०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४–०० | ३–०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४–५० | ३–०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १–७५ | ३–०० |
| २३) | " | इंग्रजी | १–७५ | ३–०० |
| २४) | " | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | " | गुजराथी | १–५० | ३–०० |
| २६) | " | हिंदी | १–७५ | ३–०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ट ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | ३–०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५–२५ | ३–०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–०० |
| ३०) | ,, | मराठी | १–५० | ३–०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०–९० | ३–०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०–०० प्रत्येकी प्रत १–००
(व्ही. पी. ची पद्धत नाहीं)

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १–६५ | ३–०० |
| २) | ,, | १०"×१४' | १–१० | ३–०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०–५५ | ३–०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०–२० | ३–०० |
| ५) | ,, | २"×३" | ०–१५ | ३–०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | ३–०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १–०० | ३–०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३–०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०–८५ | ३–०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो , | ९'×१२' | १–१० | ३–०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १–६५ | ३–०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०–७५ | ३–०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६–०० | ८–०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. रा. द. बने, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई १४.